शनिवार, १५ एप्रिल २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२२२

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 15 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-222 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5




# इंडोनेशिया हॅकर्सचा @ वेबसाईट्सवर डोळा

आधुनिक केसरी

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अख्यारित असलेल्या इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर (१४ सी) ने गुरुवारी सर्व राज्य आणि केंद्र शासित प्रदेशांतील सरकारांना एक महत्त्वाचा अलर्ट जारी केला आहे. इंडोनेशियातील काही हॅकर ग्रुप भारतातील जवळपास १२ हजार सरकारी वेबसाईट्सवर सायबर हल्ला करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे सर्व राज्य आणि केंद्र सरकारच्या संकेतस्थळावर तांत्रिक लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मनीकंट्रोलने यांसदर्भातील वृत्त दिले आहे.

राज्य आणि केंद्र सरकारची अनेक संकेतस्थळे हॅकर्सकडून लक्ष्य करण्यात आली आहेत. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी प्रतिबंधात्मक पावले उचलण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या काळात कोणत्याही संकेतस्थळावर हल्ला होणार नाही यासाठी दक्ष राहण्यास सांगण्यात आले आहे.

## याआधीही झाले आहेत सायबर हल्ले

**मलेशिअन हॅकर्सने गेल्यावर्षी भारतीय संकेतस्थळांना लक्ष्य केलं होतं. भाजपाच्या तत्कालीन प्रवक्त्या नुपूर शर्मा यांनी पैगंबर मोहम्मद यांच्याबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. यावरून आखाती देशांनी भारताविरोधात संताप व्यक्त केला होता. त्याचाच परिणाम म्हणून मलेशिअन हॅकर्सने भारताच्या सरकारी संकेतस्थळावर सायबर हल्ला केला. इस्रायलमधील भारतीय दूतावास आणि राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्थेचेही संकेतस्थळ मलेशिअन हॅकर ग्रुप ड्रॅगन फोर्सकडून हॅक करण्यात आले होते. एम्स रुग्णालयाच्याही संकेतस्थळावर गेल्यावर्षी सायबर हल्ला करण्यात आला होता. यामुळे या रुग्णालयाची संपूर्ण यंत्रणा कोलमडली होती. गेल्या वर्षभरात एकूण १९ वेळा भारताच्या सरकारी संकेतस्थळांवर सायबर हल्ला करण्यात आला आहे. त्यामुळे आता मिळालेल्या अलर्टनुसार संबंधित सरकारी संकेतस्थळांवर अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

## सरकारी कर्मचाऱ्यांना सूचना



**अनोळखी क्रमांक किंवा इमेलमधून आलेल्या कोणत्याही लिंकवर क्लिक न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशा लिंकवर क्लिक केल्यास सायबर अटॅक होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे संवेदनशील संकेतस्थळाची सुरक्षा धोक्यात येऊ शकते. तसंच, सर्व सॉफ्टवेअरचे अद्ययावतीकरण सुरू आहे, अशी माहिती सायबर सुरक्षा पुरवणाऱ्या पिंगसेफ कंपनीचे संस्थापक आनंद प्रकाश यांनी दिली आहे.**

# श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त वाशी नगरीत दाखल झालेल्या मानाच्या कावडीचे पूजन



आधुनिक केसरी

**धाराशिव :** जिल्ह्यातील परंडा तालुक्यामधील सोनारी येथील भैरवनाथाच्या यात्रेत कावडींना मान असतो. या यात्रेसाठी धाराशिव जिल्हासह,सोलापूर,लातूर,बीड जिल्हातून मानाच्या कावडी सोनारी येथील भैरवनाथ यात्रेसाठी प्रस्थान करतात. या कावडींना नारळाचे तोरण,माळा, रंगीबेरंगी आकर्षक गोंडे आदी साज चढवून सजावट करण्यात येते. बीड जिल्ह्यातील बनसारोळा इथून मोठ्या भक्ती भावाने मानाची कावड घेऊन पायी चालत आलेले भाविक विधिवत पूजा करून हलगीच्या निनादात वाशी कासारखाणी शिवारात मानाची कावड घेऊन विसावले.

यावेळी श्यामराव जाडकर, मनोज करडे, कृष्णा गायकवाड, सुधीर विश्वेकर, गणेश खडके, नवनाथ येताळ, बाळासाहेब उंद्रे(देशमुख), पिंटू करडे, सुनील रसाळ, शुभम येताळ यांच्यासह बहुसंख्य भाविकांनी या मानाच्या कावडीचे दर्शन घेतले.

दरम्यान गोविंद कोरडे यांच्याकडून या मानाच्या कावडीस अभिषेक घालून पूजा विधी करण्यात आला. यावेळी अनेक भाविकांनी दंडवत घालून नवसपूर्ती केली.

या कावडी सोबत आलेल्या भाविकांनी अल्पोहार घेऊन नंतर काठीची वाजत-गाजत मिरवणूक पुढे भूम कडे मार्गस्थ झाली.

# मुख्यमंत्री केजरीवाल यांची सीबीआय चौकशी होणार

## मद्य विक्री धोरण घोटाळा प्रकरण

आधुनिक केसरी



**पुणे :** दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सीबीआयने चौकशीसाठी समन्स बजावलं आहे. दिल्ली सरकारने मद्य विक्री धोरणात घेतलेल्या निर्णयात घोटाळा झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात आधीच दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांना अटक करण्यात आली आहे. त्यानंतर आता केजरीवाल यांनाही समन्स बजावले आहे. त्यामुळे आता दिल्लीतल्या राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. अरविंद केजरीवाल यांची १६ एप्रिलला चौकशी केली जाणार आहे. पीटीआयने यासंदर्भातलं वृत्त दिलं आहे.

सीबीआय समन्स आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह यांनी ट्वीट करून टीका केली आहे. अत्याचाराचा अंत नक्कीच होणार असल्याचं ट्वीट करत भाजपावर टीका केली आहे.

मद्य विक्री धोरण प्रकरणी २६ फेब्रुवारीला मनिष सिसोदियांना अटक झाली आहे. त्यानंतर आप आणि भाजपा यांच्यात आरोपांच्या फैरी झडत आहेत.


### काय आहे नेमकं प्रकरण?

२०२०-२१ मध्ये दिल्लीतल्या मद्य धोरणात दिल्ली सरकारने बदल केला होता. काही ठराविक कंत्राटदारांनाच त्यात फायदा मिळवून दिल्याचा आरोप आहे. संबंधित योग्य त्या विभागाच्या संमती न घेताच लायसन्स फीमध्ये सवलत दिल्याचाही आरोप आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक देणारे निर्णय पक्षपातीपणे घेतल्याचा आरोप केजरीवाल यांच्यावर आहे. या मद्य विक्री धोरणातील घोटाळ्याचा आरोप करत मनिष सिसोदियांना अटक करण्यात आली.

भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून जन्म घेतलेला पक्ष अशी आम आदमी पक्षाची ओळख आहे. पण गेल्या काही काळांमध्ये आमदार ते मंत्री असे अनेक लोक वेगवेगळ्या आरोपांखाली अटक झाले आहेत. दिल्लीचे आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन हे मनी लॉन्ड्रिंगच्या आरोपाखाली जेलमध्ये आहेत. याआधी सोमनाथ भारती यांच्यावरही घरगुती हिंसाचाराचे आरोप होते. मनीष सिसोदिया हे अटक झालेले आपचे पाचवे मंत्री होते.




## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# अजिंठ्याच्या लेण्यांतून घडणारे बुद्ध दर्शन




आधुनिक केसरी

या प्रसंगाची आठवण येण्याचे कारण म्हणजे गौतम राजवाड्यातून बाहेर पडताना दास दासी आणि पहारेकऱ्यांना झोप लागलेली असते. त्याच्या घोड्यांच्या टापांचा सुद्धा आवाज होत नाही. प्रसादातील दरवाजे, नगराच्या वेशीवरील प्रवेशद्वाराचा दरवाजा आपोआप उघडला जातो आणि कोणालाही कळण्याच्या आत गौतम नगरापासून लांब निघून गेलेला असतो. कदाचित ही सगळी नियातीचीच योजना असावी.

गौतम जेव्हा नगराचे प्रवेशद्वार उघडून बाहेर पडतो, तेव्हा प्रथमच ' मार ' त्याला सामोरा येतो. तो गौतमाला म्हणतो, ' अरे लवकरच तू या नगरीचा सम्राट आणि चक्रवर्ती राजा होणार आहेस. पुन्हा एकदा विचार कर आणि माघारी फिर. ' पण सिद्धार्थाचा निर्णय एकदा झाला होता, अशा प्रलोभनाला तो बळी पडणार नव्हता. त्याने माराच्या सांगण्याकडे दुर्लक्ष केले आणि पुढील वाटचाल सुरु केली. गौतमाच्या या वागण्याने तो मार निराश झाला. त्याचा गौतमाला विचलित करण्याचा हेतू साध्य झाला नव्हता. तो जाताना गौतमाला म्हणाला, ' मी आता जातो आहे पण लक्षात ठेव. तुझ्या मनात काम, क्रोध, वासना आदींचा थोडा जरी उगम झाला तर मी पुन्हा येईन.

मग तुला माघारी यावेच लागेल. ' या कथेत जो ' मार ' नावाचा राक्षस आहे, त्यालाच यक्ष किंवा नमुची असेही बौद्ध वाङ्मयात म्हटले आहे. बुद्धाला प्रलोभन दाखणारा आणि त्याला त्याच्या हिताच्या निर्णयापासून परावृत्त करणारा हा मार म्हणजे मानवी मनातील द्वंद्वाचेच एक प्रतीक आहे असे मला वाटते. संसारातील आसक्ती, वासना यांचे प्रतीक म्हणजे मार. आपल्या मनात नेहमी श्रेयस आणि प्रेयस यांच्यात द्वंद्व सुरु असते. आपण सामान्य माणसे श्रेयस आणि प्रेयस यातील प्रेयसची निवड सामान्यपणे करतो. श्रेयस म्हणजे जे अंतिमतः हितकर आहे ते आणि प्रेयस म्हणजे जे आपल्याला प्रिय आहे ते. प्रेयस आपले हित करीलच असे सांगता येत नाही. गौतमाने श्रेयसची निवड केली.

## आनंदी पहाट



# जीवनातील गोडी कशात आहे, हे समजनू घ्यावे



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आधुनिक केसरी

आपण अनेकदा घडून गेलेल्या घडामोडी आणण घटना हयाांच्यातच गरुफटलेले असतो. त्या लवकर ववसरत नाहीत. त्याांतही नकारात्मक गोष्टी आपल्याला अधिकच सतावत राहतात, द:ुखी करतात. आपल्या ववचाराांत सकारात्मकता आणल्याने येणारा अनुभव आणण त्याद्वारे ममळणारा आनांद ननश्चचतच आांतररक समाधान आणण मानमसक शाांती देणारा असतो. प्रत्येक बाबीकडे णखलाडू वत्तृीने बनघतले, आनांदाने प्राप्त पररश्थितीचा थवीकार के ला तर आपल्या जीवनशैलीत नक्कीच बदल घडून येऊ शकतात. चाांगली भूममका, चाांगली ध्येय आणण चाांगले ववचार असणारे लोक नेहमी आठवणीत राहतात - मनातही, शब्दातही आणण आयुष्यातही. हया सकारात्मक ववचाराांचा उपयोग आपल्याला होत राहतो. जेवणातल्या मीठाप्रमाणे जीवनात चव आणणाऱयाांपैकी आणण जीवनाची गोडी वाढवणाऱयापैकी आपण एक असावे आणण आपल्या जीवनाला साथिकता प्राप्त रून घ्यावी, असा सकारात्मक ववचार प्रत्येकाने करायला सुरुवात केली तर एकूणच वातावरणात सकारात्मकता, जाज्वल्य, आचवासकता ननमाथण झाल्याची प्रचीती येऊ लागते. आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अवि गोष्टीचा मनापासून थवीकार करतो तेव्हाच त्याांमील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या ववचाराांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या थवतःशी साांबांधित गोष्टीांशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा थवीकार के ला तरीही, आपल्या ववचाराांत आणण आचाराांत फारसा बदल होतोच असे नाही. दोन ककांवा त्याांपेक्षा अधिक व्यक्तीांमध्ये मतमभन्नता असणे थवाभाववक आणण नैसाथधगथक असते. पण मतभेद होत राहणे हे सकारात्मक सहजीवनास बाकि आणण घातक ठरू शकतात, हयाचे भान राहणे आवचयक असते. अनेकदा घडणाऱया काही घटना, घडामोडी हया ननसगथननयमाांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाधचत सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनांद हा के वळ त्याची प्रचीती आल्यामशवाय ममळत असतो.



आधुनिक केसरी

**फळे निष्कामता | पुण्य वाढे ||**

कुकर्माचे ठायी | दुःखाचेच फळ ||
सदासर्वकाळ | पाप वाढे ||१||
वासनेच्या पोटी | पातकाचे बाळ ||
नियतीचा खेळ | आकळेना ||२||
शिंदीवृक्षा खाली | ताक प्रशियले ||
जन ऐसे बोले | शिंदी प्याला ||३||
म्हणोनी संगती | करावी संतांची ||
तेणे सत्कर्माची | गोडी लागे ||४||
जळते वासना | हरिनाम घेता ||
फळे निष्कामता | पुण्य वाढे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

न जायतेऽर्थबोधस्तु
सुदीर्घं जल्पनं ततः ।
न तथा सुजनः खलु
नायाति व्यसनेऽपि सः।।३।।

खूप वेळ बडबड करूनही अर्थबोध होत नाही, तर तो खरोखर सज्जन नसतो. तो संकटातही (सहाय्यास) येत नाही.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

बड़े काम बड़ विघ्न है, करत कष्ट बहु होय ।
बड़े पुरुष तेहि करत हैं, लक्ष्य ध्येय मिल सोय ।।२३।।
(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/२३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मोठं कार्य पूर्ण करताना मोठी विघ्ने येतात आणि पुरुषार्थ करतांना अत्यंत कष्ट होतात , तरीही महापुरूष ते कार्य करतात आणि यांनाच इच्छित फलप्राप्ती होते तसेच त्यांचं ध्येय पूर्ण होतं.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.www.vihangamyoga.org

# सदवस्तू साध्य करून घेण्याचा उपाय सत्संगती

आधुनिक केसरी

एखाद्या दारूबाजाप्रमाणे विषयी मनुष्य वागत असतो. त्याला सर्व कळते, पण वळत नाही. एकीकडे स्वतःला जो परमात्म्याचा अंश म्हणवितो, आणि दुसरीकडे विषयांच्या आहारी जातो. खरोखर, भक्तीशिवाय सर्व काही वाया आहे. संताजवळ राहावे आणि भक्तीचे साधन करावे. आपल्याला काही करायचे उरले आहे असे जे वाटते, ते न वाटू लागले, म्हणजे साधनात प्रगती झाली असे समजावे. भगवंताची भक्ती घडायला गुरुसेवा हे एक मुख्य साधन आहे. जो शिष्य आज्ञा पाळतो त्याला भेटणे गुरूला भागच पडते. वास्तविक, गुरू मनात काही इच्छाच येऊ देत नाही; म्हणून कामधेनूपेक्षाही गुरू श्रेष्ठ आहे. अत्यंत तळमळीशिवाय भगवंताचा योग शक्य नाही. संतसमागम प्रारब्धाने होतो, पण 'सम' रीतीने जाता आले तर खरा 'समागम' घडतो. पण आमचा मार्ग विषय आहे; म्हणून संत भेटूनही त्याचा 'समागम' आपल्याला होत नाही. विषयांमध्ये धुंद असलेल्या आम्हांला पाहून संतांच्या मनात कालवाकालव होते;



त्याची आपल्याला कल्पनाही येणार नाही. आपली बुद्धी आपल्याला समाधानाप्रत नेत नाही, तर दुसऱ्याची मदत घेणे आवश्यक आहे. अशा वेळी, ज्यांची मदत आपण घेतो त्यांचे आपण ऐकायला नको का ? भगवंताच्या जिज्ञासेचा मार्ग आक्रमायला संतांनी सांगितले. संतांना जिज्ञासा मूळचीच असते. आपल्याला ती नाही, म्हणून ती उत्पन्न करणे भाग आहे. काही केल्याशिवायच सद्वस्तू साध्य करून घेण्याचा उपाय, म्हणजे सत्संगती हा होय. सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. ज्याचे भाग्य थोर असेल त्यालाच ती लाभेल.

एखादा मनुष्य भोवऱ्यात सापडला तर त्याला बाहेर काढण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग असा की, दुसऱ्या चांगल्या पोहणाऱ्याने त्या भोवऱ्यामध्ये उडी मारून तो फोडायचा आणि बुडत्याला बाहेर ओढून काढायचे. पण यासाठी शक्ती फार लागते. दुसरा मार्ग असा की, आपणच भोवऱ्यामध्ये बुडी मारून तळाशी जायचे आणि खालून बाहेर निघायचे. विद्वत्ता ही भोवऱ्यासारखी आहे. वर वर पाणी फिरत असते तरी तळाशी ते संथ असते. तसे, जे लोक वरवर विद्या शिकतात ते वादाच्या आणि मतांतराच्या चक्रात सापडतात; पण जे खोल तळाशी जातात त्यांना खरे काय ते आपोआप कळते, आणि ते सगळीकडे एकच असते. विद्येच्या भोवऱ्यामध्ये सापडणाऱ्यांना बाहेर ओढून काढण्याचे काम फार मोठ्या संतांचे असते. शहाण्याने त्या भानगडीत न पडावे. हजारो लोक भगवंताच्या नामाला लावणे हे खरे संतांचे काम होय. आजचे बोधवचन आहे.

१०३. कोणत्याही सत्पुरुषाची परंपरा रक्षण केली पाहिजे. त्यात आपले घुसडू नये.

श्रीराम समर्थ

## देवदर्शन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

दशक 8 आसमास 1

नमस्कार,

समर्थाचा आशिर्वाद व स्वर्गीय, बेलसरे सरांचं 'सार्थ श्रीमत दासबोध' ह्या पुस्तकाचं मार्गदर्शन, संख्य दासबोध प्रेमींचा आशिर्वादाने आपण आज आठव्या दशकाकडे वाटचाल करत आहोत. सात दशक पूर्ण झाले यावर विश्वास बसत नाही. असेचं समर्थांनी माझ्याकडून करवून घ्यावे ही नम्रतापूर्वक प्रार्थना. मी फक्त निमित्तमात्र आहे संपूर्ण श्रेय समर्थाना व बेलसरे सरांना आहे. मायोद्भव नाम आणि ज्ञानदशक हे संपूर्ण जग अनेक गुढ तत्वांनी बनलेलं आहे सुर्यचंद्र तारे आकाशगंगा, धरती, समुद्र, पाताळ, असंख्य असंख्य कोट्यवधी जीवजंतू, त्यात प्रगल्भ विचाराचा माणुस नावाचा प्राणी, कुठल्याही जीवाला यातना या असतीलचं पण या भूतलावर माणूस नावाचा जो प्राणी रहातो ना तो जगातील सगळ्यात वेगळा प्राणी आहे मित्रांनो. अत्यंत भेदाने भरलेले आयुष्य कुणाच्या वाट्याला येत असेल तर ते म्हणजे फक्त आणि फक्त मानवाला. त्याचा जन्म, जगणं, आणि मरण सगळचं अद्भुतरम्य आहे. या सर्वाचा अभ्यास विषय म्हणजे आपण आता अभ्यासणार असलेलं ज्ञानदशक होय. त्यालाच समर्थांनी 'मायोद्भव व ज्ञानदशक 'असे नाव दिले आहे. संपूर्ण विश्वाचा पसारा अनाकलनीय अद्भूत आहे.माझ्या सारखी सामान्य विचाराची अभ्यासक तर या समासापुढे अगदीच खुजी ठरते. कारण समर्थाच्या विचारांचा प्रभाव पडायला मला तर काही जन्म घ्यावे लागतील खुपसं पुण्य कमवावं लागेल मला तरी असं वाटतं. कारणं संपूर्ण ज्ञा माझ्याकडे नाही जे काही थोडं तोडकंमोडकं आहे ते मांडण्याचा मात्र प्रामाणिक प्रयत्न असेल यात शंका नाही. संपूर्ण विश्व नाशवंत आहे ते भेदभावाने भरलेलं आहे. जन्ममरण्याच्या आधीन आहे. या विश्वाला आधार देणारे आणि मूळ असणारे परब्रम्ह अद्रुष्य, अनंत, अविनाशी, एकच एक, अविकारी, गुणरहित, आणि सदा विजयी असणारे आहे. त्याला समर्थानी तीन भागात विभागले आहे. **क्रमशः**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SATURDAY 15 APRIL 2023
adhunikkesari.com Adhunik Kesari

सर्व भाविकांना हनुमान जन्मोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर

पत्ता : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

सौजन्य

इंटरनॅशनल स्पोर्टस

सरस्वती संकूल, सरस्वती भुवन बसस्टॉप समोर, औरंगपुरा, छत्रपती संभाजीनगर, मो. 9673538888, 9970702455

# ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या माध्यमातून दरोडे आणि चुकीच्या घटनांना बसणार आळा

आधुनिक केसरी

छत्रपती संभाजीनगर : ग्रामीण पोलीस दल व जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त उपक्रमातून जिल्ह्यात होणार ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित होणार असून जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या प्रयत्नातून, व सयुंक्त विद्यमाने ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत अजिंठा पोलीस ठाण्याअंतर्गत ग्राम सुरक्षा यंत्रणेचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद भिंगारे, पोलीस उपनिरीक्षक राजू राठोड, पोलीस उपनिरीक्षक गणेश काळे, गणेश लोकरे ग्राम सुरक्षा यंत्रणा वरिष्ठ विभागीय अधिकारी मकरंद कदम गोपनीय अंमलदार विकास लोखंडे, यांच्यासह अजिंठा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, पत्रकार बांधव, अशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

पोलीस स्टेशन हद्दीत संकट काळात आपत्तीग्रस्त नागरिकांनी ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या टोलफ्री नंबर 18002703600 वर कॉल केल्यास संबंधित व्यक्तीचा आवाज गावातील सर्व नागरिकांना कॉल स्वरूपात तात्काळ ऐकवला जाणार असल्याने गुन्ह्यांना आळा घालणे शक्य होणार आहे. ग्राम सुरक्षा यंत्रणेचे संचालक डी.के.गोर्डे यांनी नागरिकांना यंत्रणेचे



प्रात्यक्षिक दाखवले, अजिंठा पोलीस स्टेशन हद्दीतील गावातील नागरिकांनी यंत्रणेत पुढील 48 तासांत सहभागी होण्याचे आश्वासन दिले. ग्राम सुरक्षा यंत्रणा पोलीस स्टेशन हद्दीत कार्यान्वित करण्यासाठी 50 रुपये प्रति कुटुंब, प्रति वर्ष इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाची 15 व्या वित्त आयोगाच्या निधीतून तरतूद करणेबाबत निर्देश जिल्हा परिषद कार्यालयाकडून ग्रामपंचायतींना देण्यात आलेले आहेत. गेल्या 13 वर्षांत पुणे, सातारा, सोलापूर, अहमदनगर व उस्मानाबाद जिल्ह्यातील 4500 हून अधिक गावे ग्रामीण पोलीस स्टेशन ग्राम सुरक्षा यंत्रणेत सहभागी झाले आहेत. ग्रामस्थ आपापले मोबाईल नंबर नोंदवून यंत्रणा वापरत आहेत. संपूर्ण भारतासाठी वापरता येणारा टोल फ्री नंबर 18002703600 वर नोंदणी केलेल्या नागरिकांनी आपत्ती काळात फोन केल्यास त्याचा आवाज परिसरातील हजारो नागरिकांना त्वरित मोबाईल वर ऐकू जातो. परिसरातील नागरिकांना घटनां घडत असतांनाच घटनेची माहिती मिळाल्याने तातडीने मदत करणे व नुकसान टाळणे शक्य होते.

### ग्राम सुरक्षा यंत्रणेची उद्दिष्ट

घटनाग्रस्त नागरिकांना परिसरातील नागरिकांची तातडीने मदत मिळणे, गावातील कार्यक्रम / घटना विना विलंब नागरिकांना एकाच वेळी कळविणे, अफवांना आळा घालणे, प्रशासनाला नागरिकांशी जलद संवाद साधता येणे, पोलीस यंत्रणेस कायदा सुव्यस्था कायम राखणे कामी नागरिकांचे सहकार्य मिळणे.

### ग्राम सुरक्षा यंत्रणेची वैशिष्ट्ये

संपूर्ण स्वयंचलित यंत्रणा गावासाठी यंत्रणा सुरु करणे व सहभागी होण्यासाठी सोपी पद्धत संपूर्ण भारतासाठी एकच टोलफ्री नंबर 1800 270 3600 यंत्रणेत सहभागी असलेला कोणताही नागरिक आपत्ती काळात संपूर्ण परिसराला सावध करू शकतो, संदेश देणाऱ्या व्यक्तीच्या आवाजातच संदेश कॉल स्वरुपात परिसरातील नागरिकांना मिळतो,.दुर्घटनेचे स्वरूप, तीव्रता, ठिकाण कळल्याने गावकऱ्यांना विना विलंब व नियोजनबद्ध मदत करता येते, नियमानुसार दिलेले संदेशच स्वयंचलित रित्या प्रसारित होतात नियमाबाह्य दिलेले संदेश-अपूर्ण संदेश रद्द होतात व प्रसारित होत नाहीत, एका गावात चोरी करून चोर दुसऱ्या गावच्या दिशेने गेल्यास त्या गावालाही सावध करणे शक्य, वाहन चोरीचा संदेश आजूबाजूच्या 10 किमी परिसरातील सर्व दिशांच्या गावांना तत्काळ मिळतो, घटनेच्या तीव्रतेनुसार कॉल रिसीव्ह होत नाही तोपर्यंत एकसारखी रिंग वाजते संदेश पुढील 1 तास पुन्हा पुन्हा ऐकण्याची सोय, कोणत्याही वेळी आपल्यासाठी संदेश तपासण्याची सोय, चुकीचा संदेश किंवा मिसकॉल देणारे नंबर आपोआप Black List होतात, गावाबाहेर दुसऱ्या गावात अपघातग्रस्त नागरिकाचा संदेश घटना घडलेल्या परिसरातही प्रसारित होतात, सरकारी कार्यालये/पोलीस स्टेशन आदींना आपापल्या कार्यक्षेत्रातील सर्व नागरिकांना किंवा विशिष्ट एक किंवा एकापेक्षा जास्त गावांना किंवा कर्मचाऱ्यांना सूचना/आदेश देता येणे शक्य.

"चोरी दरोड्याच्या घटनेत चोर होणार तात्काळ जेरबंद, ग्रामसभा, सरकारी योजनांची ग्रामस्थांना तात्काळ माहिती मिळणार

- डि. के. गोर्डे (संचालक ग्राम सुरक्षा यंत्रणा)

# अनुकंपाधारकांचे मुंबईतील आझाद मैदानावर 17 एप्रिलपासून धरणे आंदोलन

## सर्व विभागातील अनुकंपाधारकांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

आधुनिक केसरी

**बीड :** अनुकंपाधारकांकडे शासन, प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असुन पंधरा पंधरा वर्षे प्रतिक्षा करुनही अनुकंपाधारकांचा वनवास संपलेला नाही. शासनाने सर्व अनुकंपाधारकांना विनाअट सेवेत सामावून घ्यावे यासह विविध मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर सोमवार दि. 17 एप्रिल पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात जलसंपदा, महसूल, शासकीय दुध संस्था, जिल्हा परिषद यासह विविध शासकीय निमशासकीय कार्यालयातील अनुकंपाधारकांनी बहुसंख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन अनुकंपाधारकांच्या वतीने करण्यात आले आहे.

अनुकंपाधारकांच्या मागण्याकडे शासनाने वेळोवेळी दुर्लक्ष केले आहे. केवळ कागद फिरवण्याचेच काम शासन आणि प्रशासनाकडून होत आहे. अनुकंपाधारकांना एक, दोन नव्हे तर पंधरा पंधरा वर्ष नियुक्तीची प्रतिक्षा करावी लागत आहे. अनुकंपाधारकांनी शासन प्रशासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही अनुकंपाधारकांना शासन सेवेत सामावून घेतलेले नाही. अनुकंपाधारकांना एकूण रिक्त पदाच्या वीस टक्के जागांवर विनाअट समाावून घ्यावे या मागणीसह अन्य मागण्यांसाठी अनुकंपाधारकांच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानावर सोमवार दि. 17 एप्रिल पासून धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात जलसंपदा, महसूल, शासकीय दुध संस्था, जिल्हा परिषद यासह शासकीय, निमशासकीय विभागातील अनुकंपाधारकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासनास निर्णय घेण्यास भाग पाडावे असे आवाहन अनुकंपाधारकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पहूर येथे महात्मा फुले-सावित्रीबाई फुलेंची प्रतिकात्मक शोभायात्रा

आधुनिक केसरी

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथे दिनांक १३/४/२३ रोजी क्रांतीसुर्य सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पहुर येथे साकारण्यात आलेल्या सजीव दखाव्याने पहूरकरांचे लक्ष वेधून घेतले . जणू काही महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले उतरल्या की काय? भावना उपस्थितांमधून व्यक्त झाल्या. गावातून काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेतून समाज बांधवांनी महात्मा फुलेंचा जयघोष केला.

क्षत्रिय माळी समाज संघटना आणि क्रांतीसुर्य महात्मा फुले जन्मोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महात्मा फुले जयंती उत्सवा दरम्यान क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले उत्सव समितीचे अध्यक्ष तुषार अशोक बनकर आणि त्यांच्या अर्धांगीणी सौ .आश्विनी तुषार बनकर यांनी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा सजीव देखावा साकारला. पहूर शहरातून त्यांची सजवलेल्या रथाद्वारे सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले ंच्या सजिव देखाव्याने साऱ्यांचेच लक्ष वेधून घेतले. महात्मा फुले माळी समाज मंगल कार्यालयात मिरवणुकीस प्रारंभ झाला. बस स्थानक



मार्गे शोभायात्रा होळी चौक, भवानी माता चौक उभ्या गल्लीतून काढण्यात आली. सर्व समाज बांधवांसह गावकरी मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी झाले होते. महात्मा फुले यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. यशस्वीतेसाठी अध्यक्ष लक्ष्मण गोरे, उपाध्यक्ष ज्ञानदेव करवंदे, सचिव दीपक जाधव, जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष तुषार बनकर, उपाध्यक्ष संदीप घोंगडे, सचिव रोशन चौधरी यांच्यासह सर्व पदाधिकारी व समाज बांधवांचे सहकार्य लाभले.

# स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते - धोंडिरामसिंह राजपूत

आधुनिक केसरी

**वैजापूर :** शालेय व महाविद्यालययीन जीवनातील विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनातून त्यांच्या भावी आयुष्याची निकोप,निरोगी,जडणघडण होऊन एक आदर्श व

जबाबदार व्यक्तिमत्व साकारत असते असे प्रतिपादन मंगळवार( ता,११ ) रोजी माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपुत यांनी रवंदे येथील शाळेत आयोजित "कलाविष्कार"या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात



केले,त्यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणकडेअधिकचे लक्ष देण्याचे आवाहन केले,या प्रसंगी कोपरगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वासुदेव दिसले यांनी शिक्षकांच्या कार्य कर्तृत्व चे कौतुक केले, कोपरगावच्या गट शिक्षणाधिकारी शबाना शेख यांनीही मुलांच्या कला गुणांचे कौतुक केले तसेच चरणसिंह काकरवाल यांनीही शिक्षक वर्गाला धन्यवाद दिले,

या कार्यक्रमात मुलां-मुलींनी विविध कला कौशल्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली,अत्यंत बहारदार असलेला हा कार्यक्रम तीन तास चालला, कार्यक्रम सूत्र संचलन शिक्षक सोमनाथ मांडाळकर यांनी केले. या प्रसंगी केंद्र प्रमुख विद्याताई भोईर, मुख्याध्यापक ए.आर.हिरवळे, पवार सर, थोरात सर व शाळेतील शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# काँग्रेसचं डॅमेज कंट्रोल?

आधुनिक केसरी

काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी हे लवकरच मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंची भेट घेतील अशी शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी यांच्यात बैठक पार पाडली. भाजपा विरोधात विरोधक एकत्र येण्यास सुरूवात झाली असं शरद पवार यांनी सांगितलं आहे. दिल्लीत ही घडामोड घडल्यानंतर आता राहुल गांधी हे मातोश्रीवर येण्याची शक्यता आहे. असं झालं तर मातोश्रीवर येणारे ते पहिलेच नेते ठरतील. ही भेट होणार का? याची तारीख काय असेल? याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं आहे. मोदी आडनावाचे लोक चोर का असतात? हा प्रश्न राहुल गांधींनी विचारला होता. त्यांच्या विरोधात गुजरातमध्ये खटला भरला होता. याची सुनावणी करताना कोर्टाने त्यांना शिक्षा सुनावली. त्यानंतर त्यांचं लोकसभेचं सदस्यत्व गेलं. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मी माफी मागणार नाही माझं आडनाव गांधी आहे सावरकर नाही असं राहुल गांधी म्हणाले होते. वीर सावरकर यांच्यावर याधीही राहुल गांधींनी टीका केली. अशात आता राहुल गांधी या सगळ्या प्रकरणाचं डॅमेज कंट्रोल करण्यासाठी मातोश्रीवर येण्याची शक्यता आहे असं बोललं जातं आहे. काही दिवसांपासून राहुल गांधी यांच्या भूमिकेमुळे, तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबत त्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे महाविकास आघाडीत आलबेल नसल्याच्या चर्चा आहेत. विशेषतः ठाकरे गट नाराज असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. त्याच पार्श्वभूमीवर कुठेतरी काँग्रेसकडून डॅमेज कंट्रोल करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचंही बोललं जात होतं. राहुल गांधी आणि उद्धव ठाकरेंची भेट त्यासाठीच होत असल्याच्याही सध्या चर्चा रंगल्या आहेत. राहुल गांधी हे लवकरच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनाही भेटण्याची दाट शक्यता आहे. राहुल गांधी आणि उद्धव ठाकरे यांची मुंबईत भेट होण्याची दाट शक्यता आहे. मातोश्रीवरच ही भेट होईल असं सूत्रांनी सांगितलं आहे. या भेटीत स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकसभा निवडणुकीत जागा वाटपाचे सूत्र यासह विविध मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

# बुद्धिमत्ता व ज्ञानाचा महासागर, महान योद्धे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



रमेश कृ. लांजेवार
9921690779

आधुनिक केसरी

**भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला पाहिजे.स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतीज्ञ,तत्वज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, वकील अशा महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म 14 एप्रिल 1891 रोजी महु इथे झाला व संपूर्ण भारतवर्षे सुर्यासारखे लखलखायला लागले.**

जनुकाय बाबासाहेबांच्या रूपात या पृथ्वीतलावर दैवी शक्तीच प्रगट होवून ज्ञान जोत प्रगटली की काय असे सर्वांनाच वाटत होते. बाबासाहेबांनी समाजाच्या हितासाठी आणि देशहीतासाठी आपले प्राणपनाला लावले. त्यामुळेच त्याच्या अथक प्रयत्नाने संविधानाच्या चौकटीत संपूर्ण भारताला बांधून ठेवले. आज प्रत्येकाला संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळत असतो.आजही अनेक देशांमध्ये हुकूमशाही दीसुन येते.परंतु बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळेच भारतीय लोकशाही टीकुन आहे. बाबासाहेब आंबेडकर यांनी तळागाळातील लोकांना न्याय मिळावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. तेव्हाच भारतात न्यायव्यवस्था प्रस्थापीत झाली. कारण बाबासाहेबांना कल्पणा होती की काही मुठभर समाज देशातील सर्वसामान्यांना कलंकीत करण्याचे काम करीत आहे.परंतु बाबासाहेबांचे या संपूर्ण हालचालींवर लक्ष होते. याकरीता समाजात जातीयवाद, धर्मवाद,पंथवाद यात कटुता निर्माण होवू नये याकरिता सर्वांना एकत्र आणन्याचे काम त्यांनी केले.आज जगामध्ये अनेक देशात बाबासाहेबांच्या विचारांची जोपासना केली जाते.कारण बाबासाहेबांच्या विचारांमध्ये ज्ञाणाचा व बुध्दीमत्तेचा अथांग महासागर आहे.त्याची तुलना समुद्रापेक्षाही अफाट आहे.कारण त्यांच्या बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा संपूर्ण जगात आजही गुणगान होतांना आपण पहातो.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानयोगी असल्यामुळे त्यांची कला जगात कोणीही अवगत करू शकले नाही.आज भारतात संपूर्ण समाज आनंदाने रहातो व बागडतो ते फक्त बाबासाहेबांच्या विचारांमुळे व संविधानामुळेच. बाबासाहेबाचा जन्म गरीब घराण्यात झाला असला तरी ते मनाने व विचाराने खूप श्रीमंत होते.आज



प्रत्येकाने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांने प्रेरीत होऊन देश घडवीण्याकरीता पुढाकार घेण्याची गरज आहे.कारण बाबासाहेबांच्या विचाराने भारतालाच नाही तर संपूर्ण जगाला मोठी प्रेरणा दिली आहे.त्यामुळे आज जगातील प्रत्येक देशात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर केल्या जातो.परंतु आजचा राजकीय पुढारी बाबासाहेबांचे विचार विसरुन समाजाच्या प्रगतीकडे लक्ष न देता स्वतःची प्रगती करतांना दिसत आहे.

याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असावे. बाबासाहेब आंबेडकर,ज्योतीबा फुले इत्यादी अनेक थोर महापुरुषांनी देश सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी अथक प्रयत्न केले व 1947 ला भारत स्वतंत्र झाला.परंतु गेल्या काही वर्षांत मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार करून वाममार्गाने मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती कमवुन देशाच्या 135 कोटी जनतेच्या खांद्यावर महागाई, बेरोजगारी, महागडे शिक्षणाचे ओझे लादले आहे. याचे दुःख बाबासाहेबांना अवश्य होत असेल. स्वतःला लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी व स्वयंघोषित समाजसेवक समजणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनो आपण वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती सरकारच्या तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणावी.असे जर कार्य राजकीय पुढारी करीत असेल बाबासाहेबांना राजकीय पुढाऱ्यांची खरी आदरांजली होईल.कारण बाबासाहेबांनी समाज हितासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले याला कुठेही तडा जाणार नाही याची जाण आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी ठेवायला पाहिजे.बाबासाहेब आंबेडकर आपले सर्वांचेच दैवत आहे.त्यामुळे जयंतीच्या निमित्ताने देशातील प्रत्येक व्यक्तीने, प्रशासनाने व सरकारने वृक्षारोपणाचा संकल्प केला पाहिजे.

कारण दिवसेंदिवस निसर्गाचा ह्रास होत आहे.त्यामुळे निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.त्यामुळे 14 एप्रिलला वृक्षारोपण व्हायला हवे यामुळे एकाच दिवशी देशात लाखोंच्या संख्येने वृक्षलागवड होईल आणि संपूर्ण निसर्ग प्रफुल्लित होईल व प्रत्येक झाडात, पानात व फुलात आपल्याला बाबासाहेबांचे दर्शन अवश्य होईल.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम!

**मागील अंकावरून ..**

स्वतंत्र चालायला शिकावे लागते. आपण लहानपणी सायकल कशी शिकलो ते आठवा.सुरुवातीला आधार घेतले. नंतर हळू हळू कळत नकळतते सोडले.म्हणूनच आपल्याला आपला तोल स्वतंत्रपणे सावरता आला. आपल्याला कुणी मागे धरले आहे की नाही याचीच चिंता करीत बसलो तर आपल्याला सायकल चालवता येणार नाही. आपली भीती जाणार नाही.कृष्ण अर्जुनाला शिकवताहेत. स्वतःचे मार्ग स्वतः शोधायला. स्वतःच स्वतःचा आधार व्हायला.जीवनात चढ उतार येणार.वादळ वारे,उनपाऊस असणार. अशा अवस्थेत आपण आपल्या मनाचे संतुलन कसे सांभाळतो,स्वतःला कसे स्थिर करतो यावर आपली अध्यात्मिक प्रगती,उन्नतीअवलंबून असते.

# ध्यान योग – मंथन




डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**कर्म फला विषयी चे आकर्षण,attachment, सोडायला सांगितले आहे.मेंदू, हृदय या बायोलोजिकल संज्ञा आहेत. मन,आत्मा ,चित्त,चेतना कोनशसनेस, या आध्यात्मिक, स्पिरीचूअल संज्ञा आहेत.स्वतःचा विचार सोडून केलेले उत्कृष्ठ कार्य तुम्हाला सफलते च्या शिखराकडे घेऊन जाईल. तुम्ही तुमच्यातले सर्वोत्तम ते देण्याचा प्रयत्न करा. अनाश्रीत व्हा. आश्रित, दीन होऊ नका.कुणाचे बोट धरून सगळा प्रवास करायचा नसतो. काही अंतरावर बोट सोडावेच लागते.**

शरीर एकाग्र करण्यासाठी मन विचार विरहित करण्यासाठी ध्यान धारणा सांगितली आहे. इथे श्वासा वरचे नियंत्रण महत्वाचे आहे.श्वास म्हणजे प्राण.श्वास म्हणजे शरीरातील चेतना. श्वास थांबला की सारेच संपले असे आपण म्हणतो.मनाला सात्विक करायचे आहे, स्वच्छ करायचे आहे. विचार मुक्त करायचे आहे.ध्यान धारणेसाठी कुठलेही रूप,कुठलेही नाव चालते.तुमची श्रध्दा असेल त्या प्रमाणे. त्या रुपाशी,नावाशी पवित्र घनिष्ठता ,स्थिरता,निष्ठा,श्रध्दा हवी म्हणजे झाले.नजर बदली तो दुनिया बदली.सौंदर्य दृष्टीत असते.विचारात पावित्र्य हवे.मग ज्ञान आपोआप मनात झिरपेल.अंतरंगात रुजेल.आपला पोशाख म्हणजे आपण नाही.पोशाख वेगळा.धारण करणारा वेगळा.अन् या देहातील अव्यक्त आत्मा आणिकच वेगळा.आपल्याला बाह्या पासून आत,अंतरंगात शिरायचे आहे. आपल्या पदव्या, आपले नाव,आडनाव ,आपले नाक डोळे ,चेहरा ही आपली ओळख नाही.हे दर्शनी ओळख पत्र झाले! आपल्याला अदृश्य आत्म्याची , अंतरंगा ची ओळख करून घ्यायची आहे. मी कोण? याचा शोध घ्यायचा आहे.देहाच्या आतल्या खोल गुहेत शिरायचे आहे. भवती अज्ञानाचा अंधार आहे.उंच सखल अडथळे आहेत.ontकुणाचा तरी पाठीशी अदृश्य हात आहे.आधार आहे.पण प्रवास आपला आपल्यालाच करायचा आहे. तुमचे तिकीट कुणी दुसरा काढणार नाही. तुम्हालाच तुमचे गाव ठरवायचे आहे.

महाभारत हे सायकॉलॉजीकल वॉरफेअरआहे. आपण म्हणतो आज आज अवती भवती वाईट प्रवृत्तीच्या लोकाची ,दुष्ट प्रवृत्तीच्या नराधमाची,संख्या वाढली आहे.अत्याचार,भ्रष्टाचार,होताहेत.मग नैतिकता शोधायची कुठे?पण हे सारे




आधीही होते.उलट जास्त प्रमाणात होते. पांडव नेहमी अल्प संख्यांक असतात. कौरवां ची मेजोरटी असते!तरीही आपण सत्यमेव जयते हे बोध चिन्ह वापरतो. आपण त्यावर विश्वास ठेवतो. शेवटी न्याय मिळेल या श्रद्धेवर जगतो.

आपण आपल्याला विपरित परिस्थितीत स्थिर राहायचे आहे. आपण लिमिटेड एंटीटी आहोत.परीच्छीन्न आहोत. आपल्याला मनाचे स्वामी व्हायचे आहे. झोप उडविणारी स्वप्ने बघायची आहेत. समुद्र हे पूर्ण रूप आहे. नद्या कोरड्या पडतात.विहिरी आटतात.समुद्र आटल्याचे कुणी ऐकले आहे?आपल्याला आपल्या यथार्थ ची ओळख झाली पाहिजे.आपण आपलं पोट्यांशियल ओळखलं पाहिजे. त्यासाठीच देवाने आपल्याला नैसर्गिक बुध्दी दिली आहे. खरे खोटे, चांगले वाईट याची जाण दिली आहे. पण आपण कृत्रिम बुध्दीमत्ता मोठी मानतो. तिच्या मागे धावतो.सगळ्या चेतना,साधना, आपल्या कडे असूनही!तुझे आहे तुजपाशी हे माहिती असूनही! आपणच आपल्या कर्माने मोठे होतो.आपणच आपले प्रारब्ध ठरवतो. आपले सुख दुःख याचे कार्य कारण आपणच असतो.कृष्ण अर्जुनाला हेच समजावताहेत. आपले जीवन तत्व ही खरी आपली ओळख असते. भक्तांचे प्रकार सांगितले आहेतः अर्थार्थी,जिज्ञासू, आर्त ( स्वाभिमानी),ज्ञानी. आपल्या संकुचित मनोवृत्ती चा त्याग करून या चार पायऱ्या चढायला कृष्ण सांगताहेत.हा फायनाईट पासून इन फायनाईट पर्यंतचा प्रवास आहे. असंभव ते संभव करून दाखविणाऱ्या हनुमानाचा आदर्श आपल्या पुढे हवा. कर्म करतांना स्वातंत्र्य घ्या.पण दीनता नको.शरण भाव नको.शरीर मन ताठ,स्थिर हवे.कुणाला तरी तुमची समस्या सांगा.तुमची समस्या सोडविण्याची संधी द्या.शिष्य अर्जुनाने तेच केले.ज्यांना प्रश्न विचारले जाऊ शकतात,ज्याच्याशी मोकळेपणे,निर्भिडपणे संवाद करता येतो,तेच खरे गुरू असतात- भगवान श्रीकृष्णा सारखे.

जीवनाचा एकांगी नव्हे,सर्वांगाने विचार करा. सर्व बाजू नीट समजून निर्णय घ्या.त्यानंतर तुम्ही जेव्हा अंतिम निर्णया पर्यंत पोहोचता तेव्हा खरी मनःशांती लाभते. शहाणपण महत्वाचे. म्हणजे विवेक, चांगले वाईट याची जाण,पारख.मनालाच दोस्त मानले तर तुम्हाला कधी एकटेपण जाणवणार नाही.हे की ते अशी संभ्रमावस्था म्हणजे अशांती,अस्थिरता,डामाडोल अवस्था!भगवान अर्जुनाला यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करताहेत. हेच गीतेचे सार.

दुधातच दही ताक लोणी तूप सारे काही सामावले असते. ते दिसत नाही. त्यासाठी एकेक प्रक्रिया करावी लागते. दूध नीट तापवणे,साय काढणे.विरजण घालणे. दही झाले की ते नीट घुसळणे. लोणी काढून ताक अलग करणे. लोणी मंद आचेवर तापवणे.मग शेवटी तूप मिळते. अशा पायऱ्या असतात. आपल्या आयुष्याचे देखील असेच आहे. आपल्यातले चांगले वाईट बाहेर काढायचे तर त्यासाठी वेगवेगळ्या अवस्थेतून

जावे लागेल.मेहनत घ्यावी लागेल. इथे कुठेही कमी जास्त चालत नाही. पर्फेक्शन हवे.एक ताल चुकला की पुढचे सारे चुकत जाते.प्रत्येक पायरीवर सावधगिरीची गरज असते.दक्षतेची गरज असते. जे तुम्हाला आवडते त्याचा ध्यास घ्या.आनंद घ्या. त्याचा श्रध्देने पाठ पुरावा करा.मनातल्या राग द्वेष अशा विकाराचे निर्बलीकरण करा.ध्यानाने तुमची स्वतःची क्षमता आपोआप वाढते.मन स्थिर शांत होते.हाच कल्याण पथ,स्थिर पथ.ध्यानाने मन प्रसन्न चित्त होते.हीच योगावस्था!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मोदींची डिग्री बनावट की खरी?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**गेल्या काही दिवसांपासून भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डिग्रीवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. नरेंद्र मोदींची डिग्री बनावट की खरी? असा प्रश्न निर्माण केला जात आहे. या पदवीचा विषय आणि त्यावरील फॉंट यावरूनही आक्षेप घेण्यात आले आहेत. विरोधकांकडून या मुद्द्याचं राजकारण केलं जात असतानाच पी.एम मोदी यांच्या डिग्रीचा विवाद काय आहे हे जाणून घेण्याचा हा प्रयत्न. अरविंद केजरीवाल पंतप्रधान मोदींना निरक्षर म्हणण्याचा प्रयत्न करत आहेत आणि असे करताना ते पंतप्रधानांसाठी असे शब्द वापरतात. ते खूप वरवरचे दिसते. पीएम मोदींच्या पदवीवर सातत्याने प्रश्न उपस्थित करणाऱ्या केजरीवाल यांना गुजरात उच्च न्यायालयाकडून दणका बसला आहे. उच्च न्यायालयाने त्याला २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. याचे कारण म्हणजे पंतप्रधान मोदींच्या पदवीची माहिती सार्वजनिकरित्या उपलब्ध असूनही हा मुद्दा कायदेशीर कचाट्यात अडकला आहे.**




दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची अस्वस्थता गेल्या काही आठवड्यांत अनेक पटींनी वाढली आहे.त्यांचे दोन मंत्री तुरुंगात आहे. मात्र गुजरात उच्ध न्यायालयाने केजरीवाल यांनी हवाच काढून नाही तर

गुजरात हायकोर्टाने चमत्कार केला आहे. ऐतिहासिक निकाल दिला आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पंतप्रधान मोदींच्या बीए आणि एमए पदवीची मागणी केल्याप्रकरणी २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. यासोबतच केंद्रीय माहिती आयुक्तांचा तो आदेशही रद्द करण्यात आला आहे ज्यात त्यांनी दिल्ली आणि गुजरात विद्यापीठ तसेच पीएमओला केजरीवाल यांना पंतप्रधानांची पदवी दाखवण्याचे आदेश दिले होते. या पंतप्रधानांच्या पदव्या कोणालाही देण्याची आणि दाखवण्याची गरज नाही, असे गुजरात उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

अरविंद केजरीवाल यांनी कपाळावर डोके ठेवून गुजरात उच्च न्यायालयाचा निर्णय मान्य केला आहे. पण मोदींवर हल्ला चढवायला चुकले नाहीत. तो निर्विकारपणे म्हणाला. देशाचा पंतप्रधान किती शिक्षित आहे हे जाणून घेण्याचा अधिकार देशाला आहे. गुरुवारीच आम आदमी पक्षाने दिल्लीत ठिकठिकाणी पोस्टर लावले होते की, 'भारताचे पंतप्रधान शिक्षित असावेत का?' गेल्या अनेक दिवसांपासून केजरीवाल पीएम मोदींच्या शैक्षणिक पात्रतेवर कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे प्रश्न उपस्थित करत आहेत. केजरीवाल उपहासात्मक स्वरात म्हणतात की कमी शिक्षित पंतप्रधान देशासाठी हानिकारक आहेत. धूर्त अधिकारी कमी शिकलेल्या पंतप्रधानांना चुकीचे निर्णय घ्यायला लावतात. यामुळे देशातील जनतेचे नुकसान होत आहे.

खरे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी सुरुवातीपासूनच त्यांच्या पदवींबाबत प्रश्नांच्या वर्तुळात आहेत. आम आदमी पक्ष सुरुवातीपासूनच पंतप्रधानांच्या डिग्रीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. २०१६मध्ये हे प्रकरण खूप गंभीर बनले होते. इतके की, तत्कालीन भाजप अध्यक्ष आणि विद्यमान गृहमंत्री अमित शहा आणि अर्थमंत्री अरुण जेटली यांना पंतप्रधानांच्या बचावासाठी यावे लागले. या दोघांनीही नियमित पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पदव्या सार्वजनिक केल्या होत्या. मात्र त्यानंतर लगेचच सामान्यांचे तत्कालीन प्रवक्ते आशुतोष यांनी पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधानांच्या पदव्या बनावट असल्याचे सांगून वादाच्या आगीत तूप टाकले.

भाजप आणि आपच्या परस्परविरोधी दाव्यांमुळे पंतप्रधानांच्या पदव्यांबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. गुजरात उच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाने हे धुके कमी होण्याऐवजी उलट वाढले आहे. पंतप्रधानांची शैक्षणिक पात्रता सार्वजनिक होण्यापासून रोखणे हे हास्यास्पद आहे. पदव्या लपवणे तर्कसंगत नाही. त्यांच्या मागणीसाठी दंड आकारणे हे एक टोकाचे आणि दडपशाहीचे पाऊल आहे.

पंतप्रधानांच्या पदव्या त्यांच्या कार्यालयाच्या वेबसाइटवर अपलोड करून सार्वजनिक केल्या जाऊ शकतात. तुम्हाला तिथे काय पहायचे आहे ते पहा. मात्र हे केले जात नाही. आरटीआय अंतर्गत माहिती मागवून अनेकांची दमछाक झाली. पण माहिती मिळाली नाही. जर अंशांमध्ये तफावत नसेल, ती सोळा आणे, २४ कॅरेट शुद्ध असली, तर ती का लपवली जात आहेत.

मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना आरटीआय कार्यकर्ते रोशन शाह यांनी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत अनेकवेळा आरटीआय अंतर्गत माहिती मागवली होती. त्यांना माहिती देण्यात आली नाही. केंद्रीय माहिती आयुक्तांच्या आदेशानंतरही एमएच्या प्रवेशावेळी मोदींनी कोणत्या विद्यापीठातून पदवीसाठी अर्ज केला होता, याची माहिती गुजरात विद्यापीठाला देता आली नाही. काँग्रेसचे प्रवक्ते शक्तीसिंह गोहिल यांनी काही काळापूर्वी मोदींच्या जन्मतारखेबाबत प्रश्न उपस्थित केला होता. निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात मोदींनी त्यांची जन्मतारीख १७ सप्टेंबर १९५० दिली आहे. तर श्री बीएन स्कूल, वडनगर, गुजरात येथून जारी केलेल्या एसएसएसी प्रमाणपत्रानुसार, त्यांची जन्मतारीख २९ ऑगस्ट १९४९ आहे. या दोन तारखांपैकी कोणती तारीख बरोबर आहे? हे फक्त मोदीच सांगू शकतात.

सात वर्षांपूर्वी भाजपच्या मुख्यालयात वितरित करण्यात आलेल्या पंतप्रधानांच्या पदव्यांवरून त्यांची एमएची पदवी मूळ नसल्याचे दिसून येते. त्यावर डुप्लिकेट कॉपी लिहिली होती. मूळ प्रत हरवल्यानंतर डुप्लिकेट कॉपी घेतली जाते. यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील. दोन राष्ट्रीय वर्तमानपत्रात जाहिरात द्यावी लागते. प्रतिज्ञापत्र द्यावे लागेल. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदींनी दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, ते १९६७ मध्ये एसएससी म्हणजेच १२ वी उत्तीर्ण झाले. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून १९७८ मध्ये बीए आणि १९८३ मध्ये गुजरात विद्यापीठातून एमए केले. त्याने हायस्कूल कधी आणि कुठे केले? यावर अजूनही सस्पेन्स कायम आहे. प्रतिज्ञापत्रात त्याचा उल्लेख नाही. हायस्कूल ही शैक्षणिक पात्रतेची पहिली पायरी मानली जाते. हे नाव आणि जन्मतारखेचे मूळ प्रमाणपत्र मानले जाते. मोदींच्या पदवीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्यांनी अद्याप याकडे लक्ष दिलेले नाही. २३ वर्षांपूर्वी माजी पत्रकार आणि आताचे काँग्रेस नेते राजीव शुक्ला यांना दिलेल्या मुलाखतीच्या २८ सेकंद भागामध्ये मोदी हे हायस्कूल पास आउट असल्याचे सांगत असल्याचे दाखवण्यात आले आहे. ही व्हिडिओ क्लिप गेल्या वर्षभरापासून सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तोच व्हिडिओ काँग्रेस सरचिटणीसांनीही ट्विट करून मोदींना विचारले की, 'पंतप्रधान, तुम्ही फक्त हायस्कूल पास आहात असे गृहीत धरत आहात का? किंवा हा व्हिडिओ खोटा आहे. आमचा पंतप्रधान हा हायस्कूल पास आहे याने आम्हाला काही फरक पडत नाही. परंतु आपण त्याबद्दल प्रामाणिक नसल्यास हे महत्त्वाचे आहे.

एका टीव्ही चॅनलने या व्हायरल व्हिडिओचे सत्य समोर आणले होते. व्हिडिओच्या पुढील भागात मोदींनी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेबद्दल तपशीलवार माहिती दिली आहे. राजीव शुक्ला यांचा प्रश्न - फक्त शाळेपर्यंत, प्राथमिक शाळेपर्यंतच अभ्यास केला? मोदी : हायस्कूलपर्यंत. नंतर आमच्या संघाच्या अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून आम्ही बाह्य परीक्षा देऊ लागलो. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून बाह्य परीक्षा देऊन बीए केले. तरीही त्यांच्या सांगण्यावरून मी एम.ए. कॉलेजचा दरवाजा कधी पाहिला नाही पण विद्यापीठात पहिला आलो. पण कदाचित याला संघाचे संस्कार म्हणा किंवा तुमच्या अधिका-यांची प्रेरणा म्हणा, ज्यामुळे ते एक ना एक प्रकारे स्वतःच्या विकासात गुंतलेले आहेत.

हा व्हिडिओ अनेक वर्षांपासून सोशल मीडियावर आहे. मात्र भाजप नेत्याने यावर कधीच प्रश्न उपस्थित केला नाही. पंतप्रधानांनीही मौन बाळगले. या मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पंतप्रधानांनी किती वाचले? काही फरक पडत नाही. शाळा-कॉलेजच्या अनुभवांपेक्षा माणूस आयुष्यातील अनुभवांतून जास्त शिकतो. माजी राष्ट्रपती ग्यानी झैल सिंग हे आठवी पास होते.

पंतप्रधानांच्या शैक्षणिक पात्रतेवर प्रश्न उपस्थित करणे लज्जास्पद आहे. उठू नये. मात्र प्रश्न निर्माण झाल्यास तातडीने उत्तर देऊन प्रकरण मिटवावे. पण असे झाले नाही. जगात असे अनेक लोक आहेत ज्यांना वाचता आले नाही पण सार्वजनिक क्षेत्रात यशाचा झेंडा रोवला.

पंतप्रधान एमए पास असल्यास. मग गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी आपल्या पदव्या सार्वजनिक का केल्या नाहीत, असा प्रश्न उपस्थित होतो. पंतप्रधान झाल्यावरही त्यांना जनतेसमोर का आणले नाही. त्यांच्या पदवीवरून वर्षानुवर्षे वाद सुरू आहे. पंतप्रधान गप्प का? त्यांनी पुढे यावे. दिल्ली आणि गुजरात विद्यापीठे पदवीची पडताळणी करून वाद का मिटवत नाहीत. या सर्व प्रश्नांची उत्तरे मागताहेत.

आम आदमी पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांना पंतप्रधानांची पदवी बनावट असल्याचे वाटत असेल, तर त्यांनी खोटे शपथपत्र दाखल केल्याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध निवडणूक आयोगात तक्रार करावी. पंतप्रधानांचे प्रतिज्ञापत्र खोटे असल्याचे सिद्ध झाल्यास त्यांचे लोकसभेचे सदस्यत्व रद्द केले जाईल. यामुळे तुम्हाला राजकीय किनार मिळेल. २०१५ मध्ये दिल्लीचे तत्कालीन मंत्री जितेंद्र सिंह तोमर यांच्या डिग्रीची चौकशी करण्यासाठी भाजपने जमीन-आसमान एक केले. त्याच्या पदव्या तपासण्यात आल्या. या पदव्या बनावट असल्याचे आढळून आले. तोमर यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांना मंत्रीपद मिळाले. त्यांना अटक करून तुरुंगात पाठवण्यात आले. जितेंद्र सिंह तोमर यांच्या डिग्रीची पडताळणी होऊ शकते, तर पंतप्रधानांच्या डिग्रीची पडताळणी का होऊ शकत नाही?

देशाच्या संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले आहेत. कायदा सर्वांसाठी समान आहे. कायद्याच्या वर कोणीही नाही. पंतप्रधान मोदींच्या पदव्या खऱ्या असतील तर त्या स्वतःहून सार्वजनिक कराव्यात. जुमलेबाजीत केजरीवाल मोदींपेक्षा कमी नाहीत. गुजरात हायकोर्टाने दंड ठोठावल्यानंतरही ते गप्प बसत नाहीत. तो हा मुद्दा उपस्थित करणार आहे. जेव्हा जेव्हा हा मुद्दा उपस्थित होईल तेव्हा पंतप्रधानांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाईल. पदवीचा हा डंक अतिशय विषारी आहे. त्यामुळे पुढील निवडणुकीपर्यंत पंतप्रधान मोदींना त्रास होऊ शकतो.

# धर्मांतरितांची सभ्यता - बावीस प्रतिज्ञा



आधुनिक केसरी

**मागील काही दिवसांपूर्वी दिल्लीचे मा. सामाजिक न्याय मंत्री (कॅबिनेट) राजेंद्रपाल गौतम यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमामध्ये बावीस प्रतिज्ञांचे जाहीर पठण केल्यामुळे, त्याचे राजकीय पडसाद उमटत त्यांना आपल्या पदाचा राजीनामा देणे भाग पडले. विशेष म्हणजे देशातील बहुजन वादाची शेखी मिरवणारांपैकी एकाही नेत्याने त्यांना पाठिंबा तर दूरच, परंतु त्यावर प्रतिक्रिया देणेही टाळले. असे का घडले असावे? त्याच्या कारण मिमांसेअंती असे लक्षात येते की, त्यांची बोलण्याची इच्छा असेलही कदाचित! परंतु बहुजन समाज (एससी, एसटी, ओबीसी, एनटी, डीएनटी,एसबीसी) हा त्यांचा मतदार दुखावला जाऊ नये म्हणून तर नसेल? बहुजनवादी राजकारणी त्यांना बऱ्याच ठिकाणी कातडीबचाव भूमिका घेणे क्रमप्राप्त ठरते. अन्यथा संधीसाधू मनुवादी त्यांना धर्मविरोधी ठरवून कचाट्यात पकडण्याची संधी कदापिही सोडत नाहीत.**

**भिमराव परघरमोल**
**व्याख्याता तथा अभ्यासक फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारा**
**तेल्हारा जि. अकोला**
**मो .९६०४०५६१०४**

कदाचित बहुजन समाज आपल्या इतिहासासंबंधी जागृत असता? तर मनूवाद्यांनी कितीही कूसंधीच सोनं करण्याचा प्रयत्न केला असता, तरीही तो फळाला आला असताच असे नाही. म्हणून बहुजन समाजाने आपला इतिहास समजून घेणे गरजेचे आहे. कारण जो समाज, जे राष्ट्र, जी कौम आपला इतिहास विसरते, ते एक तर काळाच्या ओघात लुप्त होतात किंवा कुणाचे तरी गुलाम होतात. असे होऊ नये असे वाटत असेल तर त्यासाठी फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेलं 'शूद्र पूर्वी कोण होते' या पुस्तकाचं वाचन करावं जेणेकरून बऱ्याच संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होऊ शकते. त्यामधून आम्हाला कळेल की, वर्णव्यवस्थेमध्ये आमचं स्थान काय? आमचा वर्ण कोणता? आमचा वर्ण जर शूद्र असेल तर तो कसा झाला? खरोखर आम्ही शूद्रच होतो, की पूर्वाश्रमीचे मूळनिवासी राज्यकर्ते? आमचा आणि बुद्ध धम्माचा काही संबंध होता का? असेल तर तो कसा संपुष्टात आला? तो कोणी आणि केव्हा संपुष्टात आणला? या सर्वांची उत्तरे मिळाली असती तर, बावीस प्रतिज्ञांचा आणि आमचा किती व कसा संबंध आहे हेही कळले असते.

आता बावीस प्रतिज्ञांच्या संदर्भात बोलायचे झाल्यास त्यांचा उदय, उगम, विकास, प्रचार आणि प्रसार कसा झाला? बौद्ध साहित्यातील कोणत्या ग्रंथामध्ये त्यांचा समावेश आहे? जगभरात प्रचंड प्रमाणात बौद्ध साहित्य उपलब्ध असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या का दिल्या? त्याची प्रासंगीकता काय होती?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील समाज व्यवस्थेचा अभ्यास केला असता सर्व प्रयत्नांती त्यांच्या असे लक्षात आले की, भारतातील क्रमिक असमान विषमतावादी जाती व्यवस्थेचा डोलारा नेस्तनाबूत करणे कठीणच नाही तर ती अशक्यप्राय बाब आहे. तसेच लहान-मोठा, उच्चनीच, गरीब-श्रीमंत, वरचा-खालचा अशा या वर्गीय साखळीमध्ये आपल्याला कुठेही स्थान नसल्यामुळे, आपण आपली कडी कुठल्यातरी समतावादी भक्कम साखरदंडासोबत जोडावी म्हणून त्यांनी धर्मांतराची भीमप्रतिज्ञा करून तब्बल २१ वर्षांनी ती पूर्णत्वास नेली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धम्मक्रांती ही अद्वितीय आणि अजोड होती. अवघ्या अर्ध्या तासांमध्ये त्यांनी आपल्या पाच लक्ष अनुयायांना धम्मदीक्षित केले. सोबतच त्यांनी प्रत्येकाला प्रत्येकाने दिक्षित करण्याचा अधिकार देऊन बौद्ध परंपरेमध्ये नवीन पयंडाही घातला. आणखी त्यात नाविन्याची भर म्हणजे जागतिक स्तरावर उपलब्ध बौद्ध साहित्यामध्ये कुठेही न दिसणाऱ्या बावीस प्रतिज्ञांची स्वतः प्रसव करून त्याही प्रदान केल्या. बावीस प्रतिज्ञा म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक चिंतनाचा परिपाक होय. १९१३ ला लिहिलेल्या कास्ट इन इंडिया पासून तर १९५६ ला लिहिलेल्या बुद्ध आणि त्यांचा धम्म या सर्व लिखाण साहित्याचे त्यामध्ये प्रतिबिंब दिसून येते. त्यांनी गुरुस्थानी मानलेल्या बुद्ध, कबीर, फुले यांच्याही वैचारिक तथा सामाजिक चिंतनाचा त्यामध्ये प्रकाश दिसून येतो. त्या बावीस प्रकाश किरणांनी प्रत्येकाचे जीवन प्रकाशमान होईल एवढी जाज्वल्यता त्यामध्ये भासते. भारतीय संविधानाच्या कार्यान्वयनाच्या दृष्टीने सुद्धा त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. म्हणून प्रत्येक भारतीयांनी त्याचे महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञा सूत्रबद्ध व स्पष्ट अशा स्वरूपात आहेत. त्यापैकी अकरा प्रतिज्ञा ह्या जीवन जगताना काय नाकारायचं, तर उर्वरित अकरा ह्या काय स्वीकारायचं हे दर्शवतात. बुद्धाच्या तत्त्वज्ञानातून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक चिंतनातून त्यांची विभागणी केली असता बावीस प्रतिज्ञांपैकी पहिल्या पाच प्रतिज्ञा ह्या ब्राह्मणी देव देवतांना नाकारणाऱ्या आहेत. सहा ते आठ या प्रतिज्ञा भटमुक्त आणि भयमुक्त जीवन जगण्यासाठी दिलेला आहेत.

नववी व दहावी प्रतिज्ञा समतेचा संदेश देणाऱ्या असून, अकरा ते सतरा पर्यंतच्या प्रतिज्ञा ह्या बुद्धतत्त्वज्ञानाचा भक्कम पाया म्हणजे पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि दहा पारमिता यांचा संदेश देणाऱ्या आहेत. अठरा ते एकविस ह्या प्रतिज्ञा धम्माधारीत सदाचरणी जीवन जगण्यासाठी प्रेरणादायक संदेश देणाऱ्या मार्गदर्शक ठरतात. शेवटची म्हणजे बावीसवी प्रतिज्ञा ही बुद्ध, धम्म आणि संघ यांच्या शिकवणुकीप्रमाणेच जीवन व्यतीत करण्यासाठी निर्णायक आहे.

बावीस प्रतिज्ञा ह्या धर्मांतरित बौद्धांसाठी रक्तवाहिन्याच आहेत. जागतिक स्तरावर बुद्ध धम्माची दीक्षा घ्यायची असेल तर त्रिशरण पंचशील ग्रहण करणे आवश्यक आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्रिशरण पंचशीलाला मान्यता देऊन भारतीय दिक्षितांसाठी बावीस प्रतिज्ञांची अट कायमस्वरूपी घालून दिलेली आहे. त्यामुळे त्यांनी तीन गोष्टी साध्य केल्या. पहिली म्हणजे धम्माचा स्विकार किंवा धर्मांतर करणे म्हणजे मनुष्य मात्राला नीच मानून, माणसाला त्याचे नैसर्गिक हक्क-अधिकारापासून वंचित ठेवून त्याचे सर्वांगीण शोषण करणाऱ्या ब्राह्मणी धर्माचा त्याग करणे व मनुष्यमात्राला संपूर्ण पातळ्यांवर समान लेखून सर्वाधिकार बहाल करणाऱ्या बौद्ध धम्माचा स्वीकार करणे होय. दुसरी गोष्ट म्हणजे नवदिक्षित व्यक्तीला बौद्ध समाजाचे सदस्यत्व बहाल करणे. तिसरी गोष्ट म्हणजे उपासक हा सदाचरणी असेल तर तो भिक्षूपेक्षा कमी नसतो हे मान्य करणे.

बावीस प्रतिज्ञांना प्रतिष्ठा देण्याचं आणखी एक कारण म्हणजे धर्मांतरासमयी समाज हा अशिक्षित, अज्ञानी होता. त्यातच जो बौद्ध धर्म स्वीकारायचा होता त्याचे तत्त्वज्ञान समुद्रासारखे अथांग आणि अफाट पसरलेले असल्यामुळे, समुद्रातून जसे मोती काढणे दुरापास्त तसे त्या धर्मामध्ये काय जीवनोपयोगी आहे आणि काय नाही? हे कळत नव्हते. ह्या सर्व उणिवांची पूर्तता करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले बुद्धिस्ट बायबल म्हणजे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' सुद्धा अप्रकाशित होता. त्यामुळे समाजाला मूळ बुद्ध विचारांशी जोडणे मोठे जिकरीचे काम होते. त्यातच त्यांच्यावर शेकडो हजारो वर्षांचे ब्राह्मण्यवादी संस्कार असल्यामुळे धर्मांतरितांची गत ही आगीतून निघून फुफाट्यात पडल्यागत होऊ नये म्हणून आपण धर्मांतर केले म्हणजे नेमके काय निर्णय घेतला? धर्मांतरानंतर आमची सभ्यता काय आहे? आम्ही कसे वागावे? याचे स्पष्ट आणि काटेकोर निर्देश म्हणजे बावीस प्रतिज्ञा होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर आणि बावीस प्रतिज्ञा म्हणजे इथल्या सनातन, अमानवी संस्कृतीला छेद देऊन केलेली धम्मक्रांती होय. त्यामुळेच त्यांना आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्या प्रतिज्ञा महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लेखन आणि भाषणे या बावीस खंडांपैकी अठराव्या खंडाच्या भाग तीन मध्ये पृष्ठ ५१९ व ५२० वर छापलेल्या आहेत. एवढे असूनही भारतातील काही असामाजिक तत्त्वांना त्या खूपताना दिसतात. आजकाल महापुरुष तथा त्यांच्या विचारांवर वाचाळण्याची विकृती फोफावताना दिसत आहे. परंतु त्यांचे अनुयायी त्या विकृत संस्कृतीच्या कुविचारातील वाचाळविरांना सडेतोड उत्तर देण्यास समर्थ आहेत, हेही नसे

# आंबेडकरी चळवळ आणि लोककलावंतांचे सांस्कृतिक नवचैतन्य



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 1935 साली येवला मुक्कामी सभा होती. त्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेजवर येण्यापूर्वी जलसाकार भीमराव कर्डक यांचा जलसा चालू होता., तेव्हा बाबासाहेब भाषणात म्हणाले.. माझे चार भाषणाची बरोबरी भीमरावांचा एक जलसा करतो. एवढी ताकद त्यांच्या जलशात आहे. पुढे बाबासाहेबांच्या विचारांची चळवळ शाहिरांच्या मदतीने बळकट करण्यासाठी भीमराव कर्डक यांच्यासह भाऊ फक्कड, सेवादास शाहीर, केसुबुवा घेगडे, केरुबा गायकवाड , भीमराव आडगळे, अर्जुन भालेराव, केशव आहेर यांच्यासह अनेक ज्ञात आणि अज्ञात कलावंत मंडळींनी स्वतःची घरची भाकरी खाऊन बाबासाहेबांचा विचार तावूनसुलाखून निघत जन माणसात पोहोचवण्याचे महत्वपूर्ण कार्य केले.**

1956 नंतर बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर ही सांस्कृतिक चळवळ अधिक गतिमान झाली. यासाठी मोठमोठ्या चित्रपटाच्या संधी सोडून महाकवी वामनदादा कर्डक ही प्रबोधनाची चळवळ जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करतात. वामनदादा सोबत जंगम स्वामी, राजानंद गडपायले, बी काशीनंदा, गोविंदा म्हशीलीकर ,नरेंद्र जाधव, विठ्ठल शिंदे, विठ्ठल उमप, शांताराम नांदगावकर, विश्वनाथ भोसले, कृष्णा शिंदे, लक्ष्मण केदार, विजयानंद जाधव आदी असंख्य कलावंत आणि शाहिरांनी चळवळीला कुठलाही धक्का न लागू देता बाबासाहेबांची विचारधारा कायम जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. बाबासाहेबांचे उत्तुंग कार्य आपल्या कलेतून मांडताना या कलावंत आणि शाहिरांनी आपला वैचारिक तोल कधीही ढळू दिला नाही. बाबासाहेबांच्या विविधांगी पैलूवर प्रकाश टाकताना या कलावंतानी जिथे जाल तिथे वातावरण ढवळून काढले. वर्ण व्यवस्थेचा जाच जुलूम आणि त्या वेळेच्या सामाजिक स्थितीचे वर्तन या कलावंतांनी जोशपूर्ण मांडताना या कलावंतांच्या कलाप्रतिभेची चुणूक नेहमीच उजागर होत गेली. म्हणूनच बाबासाहेबांनी देखील या लोककलावंतांचा नेहमीच गौरव केल्याचे आढळून येते.

त्यानंतर 1980 च्या दशकात शाहीर दिनबंधू ,वसंतदादा मानवतकर, नागसेन सावदेकर, देवा अंभोरे, मधुकर इंगळे इत्यादीसह अनेक कलावंतांनी हा काळ आपल्या कलेने बहरून ठेवत दिनदलित लोकांत जनजागृती घडविली. दलित साक्षरतेच्या मानाने किती लोक वाचून विचार समजून घेतील हा प्रश्न होता. त्यामुळे पुढे भीम गीतांना सुरुवात झाली. आणि त्यात प्रल्हाद शिंदे, विठ्ठल शिंदे, विठ्ठल उमप, आनंद शिंदे, मिलिंद शिंदे, विष्णु शिंदे, प्रकाश पाटणकर हे अस्सल लोककलेचा बाज असलेले कलावंत भीम गीते गाऊन बाबासाहेबांचे तेजस्वी विचार ताकदीने मांडत आले. या मान्यवर कलावंताजवळ कलेचे सशक्त व्यासपीठ आणि त्यातून चळवळीत नवनिर्माण करण्याचे एक वेगळेच रसायन अंगभूत होते. पुढे सुगम संगीत प्रकारात प्रल्हाद शिंदे यांनी तर आपल्या गोड वाणीने अधिकच रस निर्माण केला. जुन्या टेपरेकॉर्डरवर या जातीवंत कलावंताच्या ध्वनीफित आवर्जून वाजवल्या जायच्या. त्याचे पडसाद आजही महाराष्ट्रातील गोरगरीब, दिनदलित लोकांच्या हृदयात जिवंत राहिलेले दिसतात. गायक प्रल्हाद शिंदे यांच्या पावलावर पाऊल टाकत आनंद, मिलिंद,



भीमजयंती विचारमाला
भाग : पाच

आदर्श ,उत्कर्ष यांनी चळवळीत शिंदेशाहीचा अविष्कार घडवून आणत बाबासाहेबांची प्रतिभा आणि प्रतिमा जपण्याचा अटोकाट प्रयत्न केलेला दिसतो.

अलीकडेच गायिका कडूबाई खरात, खंजेरी वादक मीराबाई उमप यांच्यासह अनेक महिला कलावंत बाबासाहेबांचा त्याग आणि त्यातील बोध समर्पक शब्दात ताकदीने मांडतात दिसत आहेत. त्यांच्या कार्यक्रमास लाखोचा समुदाय गर्दी करतो हे विशेष नोंद घेण्यासारखे आहे. शाहीर शितल साठे सह सचिन माळी यांचा नवजलसा आणि शाहीर संभाजी भगत यांचेही कार्यक्रमातील सादरीकरण ऐकाणा-यास मंत्रमुग्ध करून जात आहे. लोककलेचे अभ्यासक आणि चळवळीतील कलावंत डॉ.गणेश चंदनशिवे हे तर या कलेसाठी आणि महामानवाच्या विचाराचा जागर घडविण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. शाहीर नंदेश उमप आणि त्यांचे बंधू यांना वडिल विठ्ठल उमप यांच्या कलेचा वारसा आहे. म्हणूनच नंदेशचा जोश चळवळीतील सांस्कृतिक संचितांना बळ देत नेहमीच बहरत जातो आहे.

प्रसिद्ध शहर बाबासाहेब देशमुख यांच्याबरोबरच बापू पवार, किशोर सासवडे, आदर्श शिंदे ,आनंद शिंदे यांनी 'पोवाडा' हा प्रकार गाऊन महामानवाला आदरांजली वाहतात. तर अजय देहाडे, चेतन चोपडे, विशाल मोरे,अनिरुद्ध वनकर यांच्यासह इतर चळवळीतील तरुण गायक मंडळी आपल्या अंगभूत कलेला बहरत ठेवत बाबासाहेबांचे कार्य ताकदीने मांडताना दिसतात. तर " पाळणा " हा प्रकार लोकगायक

छगन चौगुले, जालिंदर ससाणे आनंद शिंदे ,लोकगायिका दिपाली शिंदे आदी कलावंत वेगळ्या लयीत सादर करून बाबासाहेबांच्या जन्मोत्सवाचे एक विहंगम चित्रण उभा करून रोमांचित करतात.

या सा-या आंबेडकरी कलावंत आणि शाहीर मंडळींना टाळ, ढोलकी, तुणतुणे, डफ,हार्मोनियम, आणि हलगीसह इतर वाद्यांची साथसंगत करणाऱ्या कलावंतांनी हा सांस्कृतिक नवचैतन्याच्या कलेचा बाज ताजातवाना ठेवत आपली वेगळी ओळख निर्माण केली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा संदेश तळागळात पोहोचवा यासाठी ही कलावंत आणि शाहीर मंडळी प्रामाणिकपणे प्रयत्न करत गेली आणि करीत आहेत. त्यांच्या अलौकिक कार्याला महामानवाच्या जयंती निमित्ताने सलाम करायलाच पाहिजे.

# चायनीज पदार्थ आरोग्यासाठी हानिकारकच



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

भारतीयांना चायनीज गोष्टीचे आकर्षण पहिल्या पासूनच आहे. अगदी चिनी वस्तूंपासून चायनीज पदार्थांपर्यंत सर्वच गोष्टी भारतीयांना आवडतात. त्यातही चायनीज पदार्थांची तर सर्वांनाच चटक लागली आहे. बाहेर जेवायला जायचे म्हंटले तर बरेच जण चायनीज पदार्थांचाच बेत करतात. मात्र भारतात आणि चीनमध्ये मिळणाऱ्या पदार्थात खूप फरक आहे. जिभेला पूरक ठरतील असे चवीचे पदार्थ येथे तयार केले जातात. रस्त्यांशेजारी, फुटपाथवर, गल्लीबोळात स्वस्त आणि सहज मिळणारे गाड्यावरील चायनीज पदार्थ खाण्याकडे सर्वांचा कल असतो त्यातही या गाड्यांवर तरुणाईच जास्त दिसते. चायनीज गाड्यांवर तरुणाईची झुंबड उडाल्याचे चित्र दिसते. ग्रुपमधील कोणा मित्राचा वाढदिवस असेल तर तो साजरा करण्यासाठी तरुणाई चायनीज गाड्यावरच जातात. हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या तुलनेत येथे स्वस्तात पदार्थ मिळतात हे त्यामागचे मुख्य कारण आहे. मात्र हे पदार्थ स्वस्त देण्यासाठी तेथील आचाऱ्यांना अनेक तडजोडी कराव्या लागतात. त्यात निकृष्ट प्रकारच्या भाज्या आणि तेल वापरले जाते. चायनीज पदार्थांमध्ये अजिनिमोटो हा पदार्थ वापरला जातो. पदार्थांना चव आणण्यासाठी या पदार्थाचा वापर केला जातो. आवश्यकतेपेक्षा जास्त अजिनोमोटो हा पदार्थ वापरला गेला तर त्याचा परिणाम पचनसंस्थेवर होऊ शकतो. चायनीज पदार्थांमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट, शेजवान सॉस, कृत्रिम रंग, स्टार्च कॉर्न यासारखे जिन्नस वापरल्यामुळे पचनसंस्था बिघडू शकते. भात, बांबूचे मूळ, मशरूम, नूडल्स, चिकन यासारख्या पदार्थांचा चायनीज पदार्थांत समावेश होतो. बऱ्याचदा



हे पदार्थ निकृष्ट दर्जाचेच असतात. चिकन, मांस अर्धवट शिजवले जातात. त्यामुळे ते पचायला जड जातात. चांगल्या प्रतीचा मैदा नसल्यास तो आतड्यात जाऊन चिकटू शकतो. चायनीज पदार्थांमध्ये वापरला जाणारा तांदूळही पॉलिश आणि रिफाईंड असल्याने पचनसंस्थेसाठी हितकारक नसतो. त्यामुळे चायनीज पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकरकच आहे. एखाद्यावेळी चायनीज पदार्थ खाल्ल्याने ते ही चांगल्या हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये जाऊन तर बिघडत नाही. परंतु आठवड्यातून चार पाच वेळा चायनीज पदार्थ खाण्याची सवय हानिकारक ठरू शकते.

# महिलांचे अस्तित्व निर्माण करणारे -डॉ.बाबासाहेब आंबेडकर



रोशनी देबाजे
औरंगाबाद

आधुनिक केसरी

**भारतामध्ये भारतीय स्त्रियांना भारतीय व्यवस्थेने माणूस म्हणून सुद्धा मान्यता दिलेली नव्हती. स्त्रीला फक्त दुय्यमच लेखले गेले नाही तर तिला दासी म्हणून गुलाम बनवून ठेवण्यात आले. स्त्रीला शिक्षण, राज्यकारभार स्वातंत्र्य या गोष्टी तर सोडा परंतु घरामध्ये सुद्धा बोलण्याचा, माणसांसारखा वावरण्याचा, एवढेच काय हसण्याबागडण्याचा, सुद्धा अधिकार नव्हता. पशुतुल्य जीवनमान महिलांचे होते. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नंतर महिलांचे अस्तित्व निर्माण होऊन महिलांना शिक्षण, आरक्षण, संरक्षण, हक्क अधिकार आणि स्वातंत्र्य बहाल करण्यात आले.**

संविधान लागू होण्यापूर्वी महिलांचा इतिहास बघितला तर मानवतेला काळीमा फासणारा इतिहास होता. महिलेला मानव म्हणून जगण्याचा अधिकार येथील व्यवस्थेने नाकारलेला होता. ज्या व्यवस्थेने महिलेला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारला त्याच महिलेला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाची राज्यकर्ती महिला बनण्याचा अधिकार बहाल केला. सर्वात अगोदर बाबासाहेबांनी एकाच जातीसाठी किंवा धर्मासाठी काम केले असे म्हणणे म्हणजेच बाबासाहेबांना व त्यांच्या कार्यांना बेईमान होणे होय. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अखिल मानव समाजाचा विकास होऊन सामाजिक समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य यासाठी होते. अनेक धर्मग्रंथांनी महिलांवर अनेक बंधने तर घातलीच होती परंतु महिलांना कोणतेही अस्तित्व दिले तर नाहीच उलट त्यांच्या भावनेचा त्यांच्या मनाचा थोडाही विचार न करता महिलांची विक्री होत असे, एक पुरुष अनेक महिलांसोबत लग्न करू शकत असे, अशा पद्धतीने महिलांचे जीवन हे नरक झालेले होते. महिला ही कुशाग्र बुद्धीची व कर्तबगार असूनही महिलांना समाजातील घडामोडींबद्दल तर सोडा, परंतु घरातील बाबींवर सुद्धा बोलण्याचा अधिकार नव्हता. घरातील पुरुषांसमोर उभे राहण्याचा सुद्धा अधिकार नव्हता. एवढेच काय तर महिलेला घरामध्ये पुरुषांसोबत जेवण्याचाही अधिकार नव्हता, महिलेने पुरुषांच्या अगोदर जेवणे हे तर पाप समजले जायचे. अशा वागणुकी महिलांना घरामध्ये मिळत होत्या, तर समाजामध्ये महिलांचे काय स्थान असेल? याची कल्पनाही न केलेली बरी महिलांना पाय असून चौकट ओलांडता येत नव्हती. महिलांकडे कौशल्य असून ते कौशल्य दाखवता येत नव्हते, महिलांकडे काम करण्याची कुवत असून माना सन्मानाचे काम करता येत नव्हते. शिक्षण, स्वातंत्र्य, हक्क, अधिकार ह्या गोष्टी तर खूप दूर होत्या. पुरुषांची दासी बनवून पुरुषांची सेवा करणे चुल आणि मुल सांभाळून घरातच राहणे हेच महिलांचे कार्य होते. वडीला कडील किंवा पतीकडील कोणत्याही संपत्तीमध्ये महिलांचा अधिकार नव्हता. पती गेल्यानंतर महिलेला पुनर्विवाह करता येत नव्हता. मूलबाळ झाले नाही तर मूलबाळ दत्तक घेता येतो नव्हते. अनेक समस्यांनी महिलाग्रस्त होत्या. पुरुषांच्या समोर बोलणे समाजामध्ये वावरणे ह्या गोष्टी तर महिलांना कल्पनाशक्तीच्या पलीकडे होत्या. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांमुळे आज महिलेला अस्तित्व तर निर्माण झालेच परंतु समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, शिक्षण, आरक्षण, संरक्षण या सर्व गोष्टी मिळून महिला सक्षम झालेली आहे. धर्मग्रंथांनी महिलांचे शिक्षण नाकारले. महिलांचे हक्क अधिकार नाकारले, महिलांना शिक्षण देणे महिलांना हक्क अधिकार देणे महिलांना पुरुषां प्रमाणे वागणूक देणे हे धर्मविरोधी होते. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी महिला सुद्धा मानव आहे आणि तिला सुद्धा हक्क अधिकाराची गरज आहे, शिक्षणाची गरज आहे, म्हणून आपले आयुष्य खर्ची घातले व ते मिळवून दिले. हिंदू कोड बिल आम्हाला फक्त महिलांना सर्वांगीण विकासासाठी धर्माच्या संहितेमध्ये बदल व्हावा म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक सुधारणा सुचविल्या. परंतु महिलांना कोणतेही हक्क अधिकार देण्याच्या मनस्थितीत नसलेल्या लोकांनी हिंदू कोड दिलेला विरोध केला. महिलांच्या न्याय हक्क स्वातंत्र्याची बिल पास होत नाही, महिलांना माणुस म्हणून वागणूक मिळत नाही, मान सन्मान मिळत नाही म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणत्याही महिलांनी कोणतेही मागणी न करता महिलांना हक्क अधिकार स्वातंत्र्य बहाल करण्यासाठी विरोध होतोय म्हणून मंत्रीपदाचा राजीनामा देणारे बाबासाहेब आंबेडकर जगातील एकमेव नेते होत. आज महिला नट्टापट्टा करून बाहेर फिरतात हे बाबासाहेबांमुळेच, आज अनेक प्रकारचे वेगवेगळे कपडे परिधान करून सार्वजनिक ठिकाणी महिलांचा वावर आहे हे फक्त बाबासाहेबांमुळेच, आज महिला शिक्षण घेते आणि हक्क अधिकाराच्या गोष्टी करते, मला ही स्वातंत्र्य आहे आणि ते मिळायलाच पाहिजेत, म्हणून महिला आवाज उठवते ही देन फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचीच आहे. ज्या महिलेला घरात बोलता येत नव्हतं ती महिला आज देशाच्या संसदेमध्ये बोलते, ज्या महिलेला घराबाहेर पडता येत नव्हते ती महिला आज विदेशात जाऊन शिक्षण घेते, नोकरी करते, एवढेच नव्हे तर पुरुषांप्रमाणे पगार सुद्धा घेते. पुरुषांप्रमाणे प्रत्येक क्षेत्रामध्ये नोकरी सुद्धा करते, आणि हे सर्व शक्य झाले ते फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांमुळे. आणि म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना एकाच जातीचे उद्धारक म्हणने म्हणजे आजही आपण गुलाम आहोत याची जाणीव करून देणे होय. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेऊन आपला इतिहास तपासणे आवश्यक आहे जेव्हा आपण बाबासाहेबांना समजून घेऊ बाबासाहेबांना वाचू त्यावेळेस आम्हाला खरे बाबासाहेब कळतील. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय महिलांना मताचा अधिकार व समान वेतन जगामध्ये पहिल्यांदा दिलेले आहे, याची जाणीवच नाही. मताचा अधिकार व समान वेतन मिळण्यासाठी जगामध्ये अनेक महिलांना रस्त्यावर उतरून आंदोलने करावी लागली. परंतु बाबासाहेबांनी ती आपल्याला फुकट दिली महिलांना समान कामासाठी समान वेतन, कामाच्या ठिकाणी स्वतंत्र व्यवस्था, कामाच्या ठिकाणाहून प्रसूतीसाठी सहा महिन्याचे पगारी रजा, ही देईल जगामध्ये न मागता कुणाला जर मिळाली असेल तर ते आहेत भारतीय महिला. एवढी मोठी देन बाबासाहेबांनी न मागता दिली. संपत्ती मध्ये अधिकार दिला, चालण्याचा ,बोलण्याचा नोकरी करण्याचा, घराबाहेर पडण्याचा शिक्षणाचा, अधिकारच दिला नाही तर त्याचे संरक्षण सुद्धा केले. एवढी मोठी देन बाबासाहेबांनी दिली म्हणून महिलांचे अस्तित्व निर्माण झाले. हे विसरून चालणार नाही. महिलांचा आवाज महिलांचा आधार, महिलांचे संरक्षण, महिलांचे आरक्षण, सर्व काही फक्त आणि फक्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आहेत. जर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मग्रंथानुसार महिलांकडे बघितले असते तर आजही महिला दासी म्हणूनच राहिल्या असत्या. आजही अनेक ठिकाणी महिलांना अनेक बंधने आहेत, परंतु ते बंधने तोडायचे असतील तर संविधानिक मार्गाने त्या महिलांना न्याय मिळू शकतो हे फक्त बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच.बाबासाहेब आंबेडकर वाचून समजून डोक्यात घेणे आवश्यक आहे. महिलांविषयी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार बघितले तर महिलांचे एकमेव सर्वश्रेष्ठ उद्धारक डॉ बाबासाहेब आंबेडकर आहेत याची जाणीव होईल. महिला हि विश्वाची जननी आहे परंतु भारतीय महिलांना चे अस्तीत्व, स्वाभिमान, मानपान निर्माण करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर एकमेव. महीलेला घटस्फोट घेण्याचासुद्धा अधिकार नव्हता तो मिळाला केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या च मुळे. महिलांवर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे एवढे उपकार आहेत की महिला कधीच ते उपकार फेडू शकत नाहीत. महिलांनी बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकारक फेडण्याचा प्रयत्न मुळीच करू नये. परंतु ते उपकार विसरूही नव्हे हिच एक अपेक्षा.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या समस्त भारतीयांना मंगलमय शुभेच्छा..

# सामाजिक न्याय विभागाच्या कोणत्याही योजना बंद केलेल्या नाहीत : सुमंत भांगे

## गैरप्रकार थांबविल्याने जाणीवपूर्वक आरोप

आधुनिक केसरी

**मुंबई :** सामाजिक न्याय विभागाच्या सर्व योजना चालू आहेत, बार्टीच्या प्रशिक्षणाच्या व इतर चालु असलेल्या कोणत्याही योजना बंद करण्यात आलेल्या नाहीत, मात्र राज्यातील सर्व सामान्य जनतेमध्ये-समाजामध्ये तेढ निर्माण करण्यासाठी खोटी व दिशाभूल करणारी माहिती ठराविक संघटना व लोकांकडून दिली जात असून आंदोलने करण्यात येत आहेत. सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्या विरोधात निवेदने दिले जात आहेत. त्याचप्रमाणे विविध प्रसार माध्यमातून देखील जनतेची दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करण्यात येत आहे. विभागाचे सचिव श्री सुमंत भांगे यांच्यावर वैयक्तिक स्वरूपाचे आरोप करण्यात येत आहेत. हे सर्व आरोप सचिव सुमंत भांगे यांनी फेटाळले असून त्यात कोणत्याही स्वरूपाचे तथ्य नसल्याचा निर्वाळा त्यांनी दिला आहे. खोटी व सामाजिक न्याय विभागाची बदनामी करणारी माहिती देऊन जनतेची दिशाभूल करण्यात येत असल्याचा खुलासा सचिव सुमंत भांगे यांनी केला आहे.

सामाजिक न्याय विभागात वर्षानूवर्षे मक्तेदारी निर्माण करणारे ठेकेदार, भोजन पुरवठा करणारे ठेकेदार, तसेच विविध प्रशिक्षणाच्या सेवा देणाऱ्या संस्था, यांचे करार संपुष्टात आले असल्याने , तसेच विभागाने केलेल्या स्थानिक स्तरावरील चौकशीत भोजन ठेकेदार दोषी आढळल्याने त्यांचा भोजन ठेका रद्द करुन त्यांच्याविरुद्ध काही ठिकाणी गुन्हे दाखल करून, त्यांना काळ्यायादीत टाकण्याची कार्यवाही प्रस्तावित केल्याने या ठेकेदारांकडून विभागाची व सचिवांची बदनामी करुन प्रतिमा मलिन करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. मात्र सामाजिक न्याय विभाग त्यांच्या



दबावाला बळी पडणार नसल्याचेही सचिव, श्री. सुमंत भांगे यांनी स्पष्ट केले आहे. आरोप करण्यात आलेल्या प्रमुख मुद्द्यांचा तपशील व त्याबाबतची वस्तुस्थिती खालील प्रमाणे....

अधिछात्रवृत्ती देण्याची मागणी बाबत!

बार्टीकडे असलेल्या निधीची तरतूद व उपलब्धता लक्षात घेता बार्टीच्या नियामक मंडळाने प्रतीवर्षी २०० विद्यार्थी संख्या निश्चित केल्यानुसार बार्टी मार्फत देण्यात येणा-या अधिछात्रवृत्तीकरिता प्राप्त अर्जापैकी बार्टीच्या धोरणाप्रमाणे 200 विद्यार्थाची गुणवत्तेच्या आधारावर अधिछात्रवृत्तीसाठी निवड करण्यात आली आहे, व बार्टीमार्फत लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या धोरणांप्रमाणे बार्टीच्या नियामक मंडळाच्या बैठकीत प्रशिक्षण कार्यक्रम बाबत स्वतंत्रपणे निर्णय घेतले जातात. महासंचालक हे बार्टीचे प्रशासकिय प्रमुख असुन बार्टीच्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत आहेत. आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार आधिछात्रवृत्ति योजनेचा सरसकट लाभ सर्वच अर्जदाराना दिला तर चुकीचा पायंडा पडेल. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभाग यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सर्वच योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे, व कोणतीही योजना बंद करण्यात आलेली नाही.

### प्रशिक्षण संस्थांची निवड बाबत !

बार्टीच्या माध्यमातून सध्या आयबीपीएस ,बँकिंग व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण देणा-या 30 संस्थाचा करार कालावधी संपृष्टात आलेला असुन कोविडच्या पार्श्वभूमीवर निविदा प्रक्रिया न राबवता एक वर्ष मुदतवाढ देण्याचा तत्कालिन परिस्थितीत सन २०२१ मध्ये निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे नव्हते. व सदर निर्णय हा तत्कालीन सचिवांच्या काळात प्राप्त परिस्थितीमध्ये घेतलेला आहे. शासनाच्या मार्गदर्शक धोरणाप्रमाणे रूपये 10 लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या खर्चाच्या योजनांसाठी ई निविदा प्रक्रिया राबविणे बंधनकारक आहे. सध्या सुरू असलेले प्रशिक्षण हे 46 संस्थांमार्फत राबवावयाचे झाल्यास पुढील पाच वर्षात रूपये एक हजार कोटी पेक्षा अधिकचा खर्च येणार असल्याने ई निविदा प्रक्रिया राबविल्याशिवाय प्रशिक्षण संस्थाची निवड करणे शासनाच्या मार्गदर्शक धोरणाच्या विपरीत होणार आहे. या ई-निविदा प्रक्रियेची सुरुवात करणे म्हणजे सचिवांनी 30 संस्था बंद केल्या असे होत नाही. पारदर्शक पध्दतीने प्रशिक्षण देणा-या संस्थाची निवड, गुणवत्ता पूर्ण प्रशिक्षण व विद्यार्थी हित याबाबीचा विचार करुन बार्टीचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम अधिक खंबीर, प्रभावीपणे राबविण्याचे निश्चित केले आहे.

### शासकीय वसतिगृहातील भोजन ठेकेदार यांच्या विरुध्द कार्यवाही !

राज्यात 10-12 वर्षापासुन भोजन ठेका पुरवठादार यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येत होती. मात्र राज्यात काही ठिकाणी त्या संदर्भात भोजनाचा दर्जा, वेळेवर भोजन उपलब्ध करुन न देणे अश्या स्वरुपाच्या तक्रारी असल्याने व त्याची विभागाने स्थानिक स्तरावर तपासणी केली असता त्यात तथ्य आढळून आल्याने काही भोजन ठेका पुरवठादारांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. दोषी ठेकेदारांचा समावेश काळ्या यादीत करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. याच गोष्टीचा राग मनाशी धरून अशा काही संस्थाचालक/ठेकेदार यांनी विभागाची व सचिवांची बदनामीची मोहीम चालवली आहे. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार त्यांना दर्जेदार सकस आहार मिळावा म्हणून नव्याने स्पर्धात्मक पद्धतीने राज्यस्तरावर भोजन ठेका देण्याची टेंडर प्रक्रिया करण्यात येत असुन वर्षानुवर्ष भोजन ठेका असलेल्या पुरवठादारांची मक्तेदारी या निमित्ताने संपुष्टात येणार असल्याने व त्यांचे हित दुखावले जात असल्याने त्यांनी देखील विविध प्रयत्न चालवले असून ही भोजन ठेका प्रक्रिया होऊ नये यासाठी विविध प्रकारे सामाजिक न्याय विभागावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न चालवला आहे. राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव म्हणून श्री सुमंत भांगे यांनी सूत्रे हाती घेतल्यापासून विभागात अनेक कामे पारदर्शक पद्धतीने राबवण्याचा प्रयत्न केला आहे व हीच त्यांची कामाची पद्धत काही संधीसाधुंना तोट्याची ठरल्याने त्यांनी विभागाचा तसेच सचिव यांचा अपप्रचार सुरू केला आहे. सामाजिक न्याय विभागाने समाजातील सर्व वंचित घटकांच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत, राज्यातील सर्व क्षेत्रिय अधिकारी यांच्या माध्यमातून अनेक नावीन्यपूर्ण योजनांची प्रभावी व यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे व येणाऱ्या काळात देखील तितक्याच गतिमान पद्धतीने व पारदर्शक पद्धतीने अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत आहे. राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील जनतेने कोणाच्याही अपप्रचाराला बळी पडू नये, राज्याचा सामाजिक न्याय विभाग त्यांच्या सर्वांगीण विकास साठी कटिबद्ध आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घालुन दिलेल्या आदर्शानुसार अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या सामाजिक, आर्थिक ,शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी सामाजिक न्याय विभाग सदैव कार्यरत असुन कायम प्रयत्नशील आहे.

# मास्कव्दारे कृत्रिम श्वासोश्वास परिचारीकांसाठी पहिल्यांदाच कार्यशाळा

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर :** परिचारिका अती दक्षता विभागाच्या कणा असतात त्या तेथे रात्रंदिवस काम करणा-या परिचारिका आणि परिचारक, त्यांना कृत्रिम श्वासोश्वास पध्दतीतील आधुनिक तंत्र शिकवून त्यांच्या ज्ञानात आणि कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रथमच त्यांच्यासाठी मास्कव्दारे कृत्रिम श्वासोश्वास (नॉन इनवेसिव्ह व्हेंटीलेशन) कसा द्यायचा यावरील कार्यशाळेचे आयोजन रविवार दिनांक १६ एप्रिल रोजी आयएमए हॉलमध्ये करण्यात आले आहे. कोरोनाच्या महामारीत कृत्रिम श्वासोश्वास यंत्रणा अर्थात व्हेन्टीलेटर हा कळीचा मुद्दा झाला होता. या तंत्राने अनेकांचे प्राण वाचवले. तोंडातून नळी टाकून कृत्रिम श्वासोश्वास दिला जातो तसेच तोंडावर मास्क लावूनही कृत्रिम श्वासोश्वास देण्याची पध्दत आहे. अती दक्षता विभागात दाखल कृत्रिम श्वासोश्वास सुरु असलेल्या रुग्णांची काळजी तेथे ड्यूटीवर असलेल्या परिचारिका डोळ्यात तेल घालून घेत असतात. त्यांना या पध्दतीसंदर्भात नवे ज्ञान देऊन त्यांची



कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रथमच एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन इंडियन सोसायटी ऑफ क्रिटीकल केअर केअर मेडिसीन (आयएससीसीएम) छत्रपती संभाजीनगर शाखेच्यावतीने करण्यात आले आहे अशी माहिती संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत सहत्रबुध्दे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत ही कार्यशाळा आयएमए हॉलमध्ये होणार आहे.

आयसीयु अर्थात अती दक्षता विभागातील परिचारिका हा सर्वात महत्वाचा घटक असतात. त्यांचे ज्ञान सतत वाढवल्यास त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होते परिणामी अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात. आयएससीसीएमने याचे महत्व, ओळखून या कार्यशाळेचे आयोजन केले आहे अशी माहिती संयोजक डॉ. श्रीकांत सहस्त्रबुध्दे यांनी दिली. कोणत्याही रुग्णालयातील अतीव दक्षता विभाग, शल्यचिकित्सा विभागातील वरिष्ठ परिचारिका, अतिव दक्षता विभागातील कनिष्ठ परिचारिका, नर्सिंगचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी या कार्यशाळेत सहभागी होऊ शकणार आहेत. शहरातील अतिव दक्षता विभाग तज्ज्ञ डॉ. श्रीकांत सहस्त्रबुध्दे, डॉ. योगेश लक्कस, डॉ. शरद बिरादर, डॉ. धनंजय खटावकर डॉ गितेश दळवी यांच्यासह या क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर मार्गदर्शन करणार आहेत. एनआयव्ही म्हणजेच नॉन इनवेसिव्ह व्हेंटीलेशनची गरज, त्याचा रुग्णाचा जीव वाचवण्यासाठी प्रभावी वापर, एनआयव्ही वर रुग्ण असताना आणीबाणीची परिस्थिती कशी हाताळायची अशा विविध विषयांवर दिवसभर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. प्रथमच कृत्रिम श्वासोश्वास पध्दतीवर प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यांना परितोषिकही देण्यात येणार आहे. त्याचबरोबर कार्यशाळेत सहभागी परिचारिकांना प्रमाणपत्र देण्यात येईल ज्याचा उपयोग त्यांना पुढील वाटचालीसाठी होणार आहे. या कार्यशाळेचा उपयोग जास्तीत जास्त परिचारीकांनी घ्यावा असं आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.




# सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या हस्ते सद्गुरु गुरु बाबांचा सन्मान


आधुनिक केसरी

**औसा :** औसा येथील संत वीरनाथ मल्लिनाथ महाराज संस्थांचे सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा राज्य सांस्कृतिक पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या शुभहस्ते व विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष सद्गुरु गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुंबई येथील मंत्रालयामध्ये प्रदान करण्यात आला. सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांनी अध्यात्मिक व सांप्रदायिक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केले. भागवत धर्माची पताका साता समुद्राच्या पलीकडे घेऊन जाण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. कीर्तन प्रवचन आणि दिव्य चक्रीभजनाच्या माध्यमातून सद भक्तांना अध्यात्माची शिकवण देण्याचे सुरू असलेले त्यांचे अविरत कार्य या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने यावर्षीचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार त्यांना दिला. याप्रसंगी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव व विविध मान्यवर उपस्थित होते. या पुरस्कारामुळे महाराष्ट्र राज्यातील संत सांप्रदाया मधून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# माळीवाडा येथे अखंड हरिनाम सप्ताह

आधुनिक केसरी

भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह माळीवाडा शेवगाव तालुका शेवगाव जिल्हा अहमदनगर येथे सप्ताहात चौथ्या दिवसाची किर्तन सेवा माझे परममित्र गुरुबंधू हभप बाळासाहेब महाराज गव्हाळ सामनगाव तालुका शेवगाव जिल्हा अहमदनगर यांची झाली प्रमुख उपस्थिती सप्ताहाचे अध्यक्ष भागवताचार्य हभप विजय महाराज जाधव राज्य गुजरात मार्गदर्शक हभप कैलासजी महाराज ढेपले पाथ्रीकर तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर मराठवाडा सप्ताह कमिटी सोपान भैया आधाट बाळासाहेब बाबर बाळासाहेब नांगरे अशोक नांगरे गणेश हराळे एल बि डाके गुरूजी दादेगावकर गणेशनगर शेवगाव भजनी मंडळी समस्त ग्रामस्थ भजनी मंडळी माळीवाडा शेवगाव माझे जिवाभावाचे जिवलग परममित्र हभप संगितविषारद प्रलाद महाराज झेंडे कर गुरूजी यांचे पट्टशिष्य नामदेव महाराज आगळे पैठणकर.



# क्रेडाई महाराष्ट्राच्या २०२३-२५ च्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ

आधुनिक केसरी

**छत्रपती संभाजीनगर:** दि. १६/०४/२०२३ रोजी संध्या. ७. वाजता हॉटेल वेलकम रामा इंटरनॅशनल येथे क्रेडाई महाराष्ट्राच्या २०२३-२५ च्या नूतन कार्यकारीणीचा पदग्रहण समारंभ आयोजीत केला आहे. क्रेडाई ही देशातील बांधकाम व्यवसायीकांची अग्रगण्य संघटना असुन २१ राज्यातील २२०००+ जास्त सभासद आहेत. क्रेडाई महाराष्ट्र क्रेडाई नॅशनलशी संलग्न असुन ISO 9001:2015 मान्यता प्राप्त संस्था आहे. महाराष्ट्रातील सुमारे ६५+ स्थानिक संघटना संलग्न असुन ३५००+ पेक्षा जास्त सभासद आहेत. क्रेडाईच्या माध्यमातुन बांधकाम क्षेत्र संघटीत व प्रगतीशील करणे हा संघटनेचा मुख्य उद्देश आहे. क्रेडाई नेहमीच शासनाला गृह निर्माण व बांधकाम क्षेत्राशी संबंधीत धोरण ठरावीताना सहयोग करत असते. तसेच सर्व क्रेडाई सभासदांसाठी पारदर्शी व्यवहार करण्यासाठी आदर्श आचार संहीता तयार केली आहे. क्रेडाई महाराष्ट्र, बांधकाम क्षेत्रातील मजुर वर्गासाठी विविध कार्य करत असते. कौशल्य विकास तसेच मेडिकल कॅम्प या सारखे उपक्रम राबवले जातात. क्रेडाई महाराष्ट्राच्या २०२३-२५ या कालावधीसाठी अध्यक्षपदी प्रमोद खैरनार पाटील व मा. सचिवपदी विद्यानंद बेडेकर यांची निवड झाली आहे. तसेच २०२३-२५ च्या कार्यकारणी मंडळात महेश साधवानी, रसिक चव्हाण, सुनिल कोतवाल, अदित्य जावडेकर, अनिश शाहा, व राजेंद्र यादव यांची उपाध्यक्ष पदी निवड झाली आहे. नरेंद्रसिंग जबिंदा मा. कोषाध्यक्ष आहेत. दिनेश ढगे, रविंद्र खिल्लारे, शांताराम पाटील, आशीष पोखर्णा, धर्मवीर भारती, राजेश वाजे यांची सह सचिवपदी निवड झाली आहे. २०२३-२५ च्या कार्यकाळात संघटनेत सुसूत्रता आणण्यासाठी विविध मुद्यावर विशेष काम करण्यात येणार आहे. महारेरा, नगर रचना, महसुल, करप्रणाली, पर्यावरण व वन विभाग संबंधीत अडचणींचे निराकरण करणे व सुसुत्रता आणने तसेच संघटनेतील प्रत्येक स्थानिक संघटना सक्षम करणे हे प्रमुख उद्देश आहेत. त्याच बरोबर सामाजिक दायित्व म्हणुन विविध कार्यक्रमांचे आयोजन जसे रेन वॉटर हार्वेस्टिंग, क्रेडाई वर्धापन दिन, वृक्षारोपन इ. कार्यक्राचे आयोजन करण्यात येईल. क्रेडाई सदस्यांसाठी सेमिनार्स, वेबिनार, युवा व्यवसायिकांसाठी युथकॉन, महीला व्यवसायिकांसाठी फेमीकॉन तसेच महाकॉन यांचे आयोजन करण्यात येणार आहे. क्रेडाई महाराष्ट्राच्या पदग्रहण सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून मा. राधाकृष्ण विखे पाटील, (महसुल मंत्री महा. राज्य), मा. संदीपानजी भुमरे, (रो.ह.यो, फलोत्पादन महा. राज्य तथा पालक मंत्री छ. संभाजीनगर) मा. भागवतजी कराड (केंद्रीय अर्थ राज्य मंत्री), मा. अतुलजी सावे (सहकार मंत्री महा. राज्य) यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच क्रेडाईचे माजी अध्यक्षीय संघटनेचे प्रमुख श्री. सतीशजी मगर व क्रेडाई महा. चे सर्व माजी अध्यक्ष, क्रेडाई महाराष्ट्राचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, सर्व ६५ स्थानिक शाखेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने पदग्रहण सोहळ्यास उपस्थित राहणार आहेत. बांधकाम व्यावसायिकांच्या देशपातळीवर कार्यरत क्रेडाईचे कार्य बावीस राज्यांतून चालते. देशात तिचे २२,००० हजार पेक्षा जास्त सदस्य आहेत. महाराष्ट्रातील ६२ शहरात क्रेडाईंच्या शाखा असून ४००० पेक्षा जास्त सभासद आहेत. छत्रपती संभाजीनगर संघटनेचे ३२५ पेक्षा जास्त सभासद आहेत. बांधकाम व्यावसायिकांच्या समस्या शासनाकडे मांडणे, त्याच्या प्रश्नांची सोडवणूक करवून घेणे अशी अनेक कामे संघटनेच्या माध्यमातून केली जातात. बांधकाम व्यावसायिकाची अधिकृत संघटना म्हणून क्रेडाई शासनाकडे या व्यावसायिकांचे प्रतिनिधीत्व करते. बांधकाम व्यावसायिकांच्या विविध प्रश्नांसंदर्भात मार्ग काढण्यासाठी नवीन तरतुदीची माहिती संघटनेच्या सभासदांना होण्याकरिता संघटना कार्य करते. यात कायद्यातील नवीन बदल, त्यांचे अर्थ, त्यानुसार करावयाची कारवाई याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाते. संघटनेच्या छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे सभासदांकरीता सातत्याने विविध उपक्रम घेतले जातात. शाखेतर्फे एक ग्राहक तक्रार निवारण मंचही स्थापन करण्यात आलेला असून, सभासद असलेल्या व्यावसायिकाविरूध्द ग्राहकाची तक्रार असल्यास मंचातर्फे दोन्ही पक्षांमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. क्रेडाईतर्फे सर्व सदस्यांच्या वैयक्तिक व व्यावसायीक मार्गदर्शनासाठी अनेक सेमीनार, शिबिरे व उपक्रम राबवले जातात. याउपक्रमात त्या त्या विषयातील तज्ञ लोकांचे मार्गदर्शन घेतले जाते. क्रेडाईतर्फे युवा सदस्यांची सुध्दा जडणघडण बाबतीत उपक्रम घेतले जातात व त्यांचे चांगल्या व्यावसायीकामध्ये रूपांतर होत असते. तसेच वुमन्स विंगतर्फे सुध्दा अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात व क्रेडाईतर्फे वुमन्स विंगला बांधकाम व्यवसायासंदर्भात महत्वाच्या विषयांचे प्रशिक्षण दिले जाते. छत्रपती संभाजीनगर शहराच्या विकासामध्ये संघटनेचा भरीव सहभाग असतो. शहर स्वच्छता, विकास याकरिता संघटना सातत्याने पुढाकार घेत असते, महानगरपालिका, मा. पोलीस आयुक्त तसेच मा. जिल्हाधिकारी यांनी केलेल्या अवाहनाला संघटनेतर्फे भरीव प्रतिसाद देण्यात येत असतो. विविध सामाजिक उपक्रमही संघटना सातत्याने राबवित असते.




### क्रेडाई छत्रपती संभाजीनगर नूतन कार्यकारीणीचा पदग्रहण समारंभ अध्यक्षपदी इंजी. विकास चौधरी, सचिवपदी आर्कि. रोहित सूर्यवंशी व कोषाध्यक्षपदी इंजी. प्रशांत अमिलकंठवार.

**बांधकाम व्यावसायिकांची संघटना क्रेडाई (कॉन्फडरेशन ऑफ रियल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया) छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वर्ष २०२३–२५ साठी नूतन कार्यकारीणीची निवड एप्रिल महिन्यातच झाली असून, या नूतन कार्यकारीणीचा पदग्रहण समारंभ शनिवार दि. १५ एप्रिल २०२३ रोजी सायकाळी ०७ वाजता हॉटेल रामा इंटरनॅशनल येथील सीता हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे. अध्यक्षपदी इंजी. विकास चौधरी, सचिवपदी आर्कि. रोहित सूर्यवंशी व कोषाध्यक्षपदी इंजी. प्रशांत अमिलकंठवार यांची निवड झाली आहे. या पदग्रहण समारंभाला मा. ना. भागवत कराड (केंद्रीय अर्थ राज्यमंत्री), पालकमंत्री मा. ना. संदिपान भूमरे, छत्रपती संभाजीनगर (रोजगार हमी योजना आणि फलोत्पादन मंत्री महाराष्ट्र राज्य), मा. ना. अतुल सावे (सहकार, इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री, महाराष्ट्र राज्य), मा. ना. अंबादास दानवे (विधानपरिषद विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र राज्य). मा. श्री. इम्तियाज जलील, छत्रपती संभाजीनगर, मा. हरिभाऊ बागडे महाराष्ट्र (विधानसभा माजी अध्यक्ष व आमदार फुलंब्री), मा. आ. सतिश चव्हाण (विधान परिषद सदस्य), छत्रपती संभाजीनगर, मा. आ. श्री. प्रदिप जैस्वाल, छत्रपती संभाजीनगर (मध्य), मा. आ. संजय शिरसाट, छत्रपती संभाजीनगर (पश्चिम) तसेच मा. श्री. चंद्रकांत खैरे, (माजी खासदार), छत्रपती संभाजीनगर यांची उपस्थिती राहणार आहे तसेच प्रमोदजी खैरनार पाटील (अध्यक्ष क्रेडाई महाराष्ट्र) विद्यानंदजी बेडेकर (सचिव क्रेडाई महाराष्ट्र) नरेंद्रसिंगजी जबिंदा (कोषाध्यक्ष क्रेडाई महाराष्ट्र), राजेंद्रसिंगजी जबिदा (माजी अध्यक्ष क्रेडाई महाराष्ट्र), राजीवजी पारीख (माजी अध्यक्ष क्रेडाई महाराष्ट्र) यांचीही उपस्थिती राहणार आहे. - नूतन कार्यकारीणीमध्ये संघटनेचे अध्यक्ष म्हणून इंजी. विकास चौधरी, मावळते अध्यक्ष आर्कि. नितिन बगाडिया, उपाध्यक्षपदी भास्कर चौधरी, संग्राम पटारे, अनिल मुनोत, इंद्रजीत थोरात, अखिल खन्ना, सिनियर एक्झिक्युटीव्ह बोर्ड मेंबर आशुतोष नावंदर, सुनील बेदमुथा, सचिवपदी आर्कि. रोहित सूर्यवंशी, कोषाध्यक्ष इंजी. प्रशांत अमिलकंठवार, सहसचिवपदी पंजाब तौर, सुनिल राका, अजित बापट, सहकोषाध्यक्षपदी बालाजी येरावार, जनसंपर्क दिपक कुलकर्णी समन्वयक गोपेश यादव, समीर मालखरे, संचालकपदी विनोद अग्रवाल, अनिलकुमार संचेती, संभाजी अतकरे, महेश लाभशेटवार, मकरंद देशपांडे, अर्चित भारूका, सौरभ गुप्ता, जयशील भालेकर, धनंजय गिरधर, यूथ विंग समन्वयक व्यासराज जंबगी तसेच क्रेडाई छत्रपती संभाजीनगर च्या वूमन्स विंग समन्वयक सौ. रेणू गोयल यांची निवड झाली आहे. सल्लागार समितीत जुगलकिशोर तापडिया, सुभाष झांबड, राजेंद्रसिंग जबिंदा, जितेंद्र मुथा, देवानंद कोटगिरे, प्रकाश मालखरे, संजय कासलीवाल, प्रमोद खैरनार, पापालाल गोयल, सुनिल पाटील, रवी वट्टमवार, नरेंद्रसिंग जबिंदा आदींचा समावेश आहे.**

# स्वरदा जोशीच्या छायाचित्रांचे पुण्यात प्रदर्शन

आधुनिक केसरी

**संजय व्यापारी**

**पुणे:** व्हिडिओ शूटिंग आणि फोटोग्राफी क्षेत्रात छत्रपती संभाजीनगरमध्ये जे काही फोटोग्राफर आघाडीवर आहेत त्यामध्ये सतीश जोशी यांचे नाव अग्रक्रमाने पुढे येते. प्रतिभावान आणि दर्जेदार छायाचित्रांच्या माध्यमातून कलाक्षेत्रात योगदान देणाऱ्या सतीश जोशी यांची मुलगीही आता या क्षेत्रात उतरली असून निसर्गातील वैविध्यपूर्ण फुलांची छायाचित्रे काढण्यावर तिने कौशल्य प्राप्त केले आहे. वडीलांचा फोटो स्टुडिओ असल्याने स्वरदाला लहानपणापासून कलेचे, फोटोग्राफीचे बाळकडू मिळाले. पुढे चालून तिने वडिलांचा फोटोग्राफीचा छंद जोपासण्यास प्रारंभ केला. एकीकडे फोटोग्राफी करत असताना शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षणाकडे तिने दुर्लक्ष केले नाही. पर्यावरण विषयात तिने एम.एस.सी. ही पदवी प्राप्त केली असून त्यात तिने गोल्ड मेडल मिळवले आहे. शिक्षणासोबतच फोटोग्राफी मधील बारकावे आत्मसात करत त्या क्षेत्रातही आपल्या प्रतिभेची उंची गाठण्याचा जोरदार प्रयत्न तिने चालवला आहे. त्याचाच एक भाग म्हणून तिने आपल्या कॅमेऱ्यातून टिपलेल्या निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यास प्रारंभ केला आहे. काही दिवसांपूर्वी तिने संभाजीनगरात आपल्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरवले होते. त्यानंतर आता तिने १३ ते १६ एप्रिल या दरम्यान पुणे येथे एरंडवणे परिसरातील सिध्दी बॅंक्वेट हॉलमध्ये छायाचित्रांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. चैतन्य आणि सुगंधाचा आविष्कार असलेल्या निसर्गातील वैविध्यपूर्ण फुलांना केंद्रस्थानी ठेवून तिने या प्रदर्शनाची मांडणी केली आहे. फुले म्हणजे प्रसन्नता, फुले म्हणजे चैतन्य, फुले म्हणजे निसर्गातील रंगांची मुक्त उधळण. अशा विविध रुपातील, स्वरुपातील नयनमनोहर फुलांची छायाचित्रे स्वरदाच्या या प्रदर्शनात पहावयास मिळतात. या प्रदर्शनात शंभराहून अधिक छायाचित्रे असून विविध प्रिंट मीडिया चा वापर केला गेलेला आहे. त्यामध्ये कॅनव्हास, मेटॅलिक, वेलवेट, एम्बोस, ॲक्रीलिक असे विविध प्रकार पाहायला मिळतात. स्वरदा ने या फुलांची निवड, अतिशय अभ्यासपूर्ण केलेली आहे. फुलांची मायक्रो फोटोग्राफी करताना हा विषय सोपा वाटत असला तरी अभ्यास, सौंदर्यदृष्टी, वेळ या सगळ्यांची सांगड घालावी लागते. ह्या सगळ्यातून उभे राहीलेले प्रदर्शन आपल्याला निसर्गाची अतिशय सुंदर ओळख पटवून देते.



# आरोग्य दिनानिमित्त सत्कार



आज प्राथमिक आरोग्य केंद्र गणोरी व उप केंद्र किनगांव येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जागतिक आरोग्य दिनानिमित्त सत्कार करण्यात आला याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ सतिश साबळे व किनगाव केंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी डॉ कल्पना साबळे वैशाली बनसोड तसेच गणोरी केंद्राच्या वाय एस गवळी. एस एम शेळके. व्हि व्हि अंधारी कर . ए ए पठाण.जे एल ढाकरे श्रीमती आर एस कैदारे श्रीमती एस व्हि खलसे के बी चित्रक देविदास बागुल श्रीमती सुनंदा जाधव आदी आरोग्य कर्मचारी व अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमांचे आयोजन बाळासाहेब शिंदे तालुका उपाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस व अध्यक्ष संत गाडगेबाबा स्मारक किनगाव यांनी केले होते.









# कोरोना काळात भारताकडून आरोग्य सेवेचे आदर्श स्थापित

## डॉ. जितेंद्र सिंग यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी

**नवी दिल्ली :** भारत देशाने सर्व नागरिकांच्या मदतीने भारतातील कोरोना महामारी, संकटाचा सामना व व्यवस्थापन युरोपीय देशांपेक्षा अधिक कार्यक्षम आणि यशस्वी रितीने केले. यासंबंधाने भारताने जगासमोर प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा रोल मॉडेल म्हणून एक उत्तम उदाहरण ठेवले आहे. असे गौरवोद्गार विज्ञान तंत्रज्ञान व पंतप्रधान कार्यालयाचे (स्वतंत्र प्रभार) राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी काढले. जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालय, राष्ट्रीय सेवा भारती आणि पुणे स्थित स्पार्क या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने 'डिझास्टर रेझिलिएंट मेथडॉलॉजीज फॉर पॅन्डेमिक' या विषयावर एका राष्ट्रीय परिषदचे आयोजन बुधवारी (१२ ) रोजी करण्यात आले. या परिषदेच्या उद्घाटन सत्रात डॉ. जितेंद्र सिंग बोलत होते. दिल्ली स्थित जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कनव्हेशन सेंटरमध्ये या एकदिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय परिषदेसाठी १४ पेक्षा अधिक राज्यांमधून तिनशेहून अधिक संशोधक, अभ्यासक व मान्यवर उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) डॉ. जितेंद्र सिंग, जवाहरलाल नेहरू विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रा. शांतिश्री पंडित, राष्ट्रीय सेवा भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष पन्नालाल भन्साळी, नॅशनल इन्स्टियट्यूट ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट दिल्लीचे संचालक व प्रकल्प प्रमुख डॉ. अनिल गुप्ता, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती पुणे महानगराचे तुकाराम नाईक, क्रस्ना डायग्नोस्टिक प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. पल्लवी जैन, स्पार्कचे संचालक महेश पोहनेरकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रमुख पाहुण्यांसह इतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी कोविड



कोविड असिस्टन्स रिसर्च डॉक्युमेंटेशन (CARE) प्रकल्पाच्या केस स्टडी बुकचे प्रकाशन डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी (डावीकडून) महेश पोहनेरकर, डॉ. अनिल गुप्ता, पन्नालाल भन्साळी, डॉ. सिंह, कुलगुरू प्रा. शांतीश्री पंडित, तुकाराम नाईक व डॉ. पल्लवी जैन.

असिस्टन्स रिसर्च डॉक्युमेंटेशन (CARE) प्रकल्पाच्या केस स्टडी बुकचे प्रकाशनही करण्यात आले. या पुस्तकात पश्चिम महाराष्ट्रात विविध सामाजिक संस्थांनी कोरोना व त्यानंतरच्या काळात केलेल्या मदत कार्याचा समाजशास्त्रीय पद्धतीने अभ्यास व त्यापासून झालेल्या सकारात्मक परिणामांचा संशोधनपर अभ्यास मांडण्यात आला आहे. पुढे बोलताना डॉ. सिंह म्हणाले की, कोरोना साथीच्या रोगाने विद्यार्थ्यांमध्ये जैवतंत्रज्ञान हे संशोधन आणि विकासाचे क्षेत्र म्हणून पाठपुरावा करण्याची जिज्ञासा निर्माण केली आहे. त्यांनी नंतर युवा सहभागींनी राष्ट्र उभारणीत योगदान देण्यावर भर द्यावा असा आवाहनही त्यांनी केले. त्याआधी डॉ. शांतीश्री पंडित यांनी जेएनयूविद्यापीठाने नेहमीच एक मजबूत राष्ट्र निर्माण करण्यासाठी काम केले आहे याविषयी विवेचन केले. जनकल्याण समितीचे तुकाराम नाईक यांनी आपत्तीच्या काळात जनकल्याण समितीचे अधिकारी आणि स्वयंसेवकांनी दिलेल्या प्रभावी मदत कार्याची माहिती दिली. तर डॉ. पल्लवी जैन यांनी कृस्ना डायग्नोस्टिक्सने महामारीच्या काळात आलेल्या अनुभवांबची मांडणी केली. व कंपनीने कोरोना काळात शासनासोबत मिळून राबविलेल्या उपक्रमांची माहिती दिली. प्राजक्ता परकाळे हिने कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. दिवसभर दोन सत्रांमध्ये झालेल्या या परिषदेत विविध आव्हानांच्या काळात पुरेशा मदत कार्यासाठी करावयाची तयारी, अशा मदत कार्यात समाजाचा सहभाग व कोरोना महामारीच्या निमित्ताने आलेल्या अनुभव व यशस्वी मदत कार्याची चर्चा व भविष्यात अशा संकटांचा कसा सामना केला जावा यासंबंधाने अभ्यासक, संशोधक आपली अभ्यासपूर्ण मते मांडली. ज्यामध्ये डॉ. युनिसेफच्या डॉ. वीना बंदोपाध्याय, एम्सचे संचालक डॉ. संजय राय, पीपीसीआरचे संचालक मनोज पोचट आदींचा समावेश होता.

# शासकीय जागेवर केलेले अतिक्रमण भोवले

## ग्रुप ग्रा.पं.म्हैसमाळ - लामणगाव येथील दोन ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्दच!

### जिल्हाधिकारी यांचा निर्णय अप्पर विभागीय आयुक्त यांनी ठेवला कायम!!

आधुनिक केसरी

**खुलताबाद :** जिवन देवचंद महेर, मुक्तार अजिज पठाण व सागर दगडू बनकर यांनी खुलताबाद तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत म्हैसमाळ लामनगाव येथील ग्राम पंचायत सदस्य लता सचिन गिरी व गणेश लक्ष्मण मोटे यांचे सदस्यत्व रद्द करण्याकरिता विधीतज्ञ शरद वि. भागडे पाटील यांच्या मार्फत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम-१४(ज-३) व १६ नुसार मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या न्यायालयात प्रकरण दाखल केली होते. संबंधित प्रकरणांमध्ये गट विकास अधिकारी कार्यालय पंचायत समिती खुलताबाद व कार्यकारी दंडाधिकारी खुलताबाद यांचा स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल मागवून घेण्यात आला. सदरील प्रकरणांमध्ये दोन्ही ग्रामपंचायत सदस्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून,शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचा अहवाल दाखल करण्यात आला होता.त्यामध्ये जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयात सुनावणी घेण्यात आली.त्यामध्ये मौजे म्हैसमाळ येथील जमीन गट क्रमांक १३६ मधील गिरीजा माता संस्थानच्या मालकी हक्क असलेल्या जमीनीवर खुलताबाद म्हैसमाळ रोडच्या उत्तर बाजूला लोखंडी पत्र्याचे शेड उभे करून, अतिक्रमण केलेले आहे. तसेच मिळकत क्रं. १७४ नमुना ८ व सहान जागा २५ × ३० व विटा सिमेंट घर १० × १५ अशी नोंद असून, ग्रामपंचायत अभिलेखे मध्ये गावठाण हद्दीत २५ × २६ विटा सिमेंट पत्र्याचे घर, १३×२६ सहान जागा, तसेच २५× ११ व १३ ×११ व पत्र्याचे शेड करून शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचे सिद्ध झाले होते. करिता,गणेश लक्ष्मण मोटे यांनी मिळकत क्रं.१५१ जिचे क्षेत्र २०० स्क्वे. फूट क्षेत्रफळ असताना प्रत्यक्ष ४६० चौ. फू.शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याचे चौकशी अंती सिद्ध झाले. तसेच जमीन क्रमांक १३६ गिरजा माता संस्थांनच्या इनाम जमिनीवर हॉटेल टाकून बांधकाम करून अतिक्रमण केल्याचे सिद्ध झाले. त्या अनुषंगाने दिनांक १०-१०- २०२२ रोजी अप्पर जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी सदस्य पद रद्द करण्याचा आदेश पारित केला होता.

तसेच सदर आदेशाच्या विरोधात नाराजीने लता सचिन गिरी व गणेश लक्ष्मण मोटे यांनी मा. अप्पर विभागीय आयुक्त,बाबासाहेब जालिंदर बेलदार विभागीय आयुक्त कार्यालय, छ. संभाजीनगर यांच्या न्यायालयात अपील दाखल केले होते. सदरील प्रकरणात सुनावणी होऊन, मा. अप्पर जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर यांनी दिनांक १०-०२ -२०२२ रोजी जो आदेश दिला होता. तो आदेश कायम करत दोन्ही ही सदस्यांचे अपील अमान्य केले व सदरील शासकीय जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण केले असल्यामुळे दोघांचेही ग्रा. पं. सदस्य पद हे रिक्त झाल्याचे घोषित झाले. शासकीय जागेवर ग्रा. पं. सदस्यांनी अतिक्रमण केले तर त्याला सदस्य पदावर राहता येत नाही. संबंधित प्रकरणात विधीतज्ञ शरद वि भागडे पाटील यांनी प्रखर युक्तीवाद करत मा. सर्वोच्च न्यायालयाने जनाबाई राठोड विरूद्ध अप्पर आयुक्त सिव्हिल एप्लीकेशन क्रं. ६८३२/२०१८ (एस.एल.पी.) सिव्हिल २४२१२/२०१७ या न्यायालयाच्या न्याय निवाड्याचा महत्वपूर्ण उल्लेख करत/ दाखला देत,त्यामध्ये आधार घेण्यात आला. सदर प्रकरणांमध्ये अर्जदार यांच्या तर्फे विधीतज्ञ शरद वि. भागडे पाटील यांनी कामकाज पाहिले.

संबंधित प्रकरणांमध्ये खुलताबाद तालुक्यातील शासकीय जमिनीवर अतिक्रमण केल्यामुळे दोघांचे (ग्रा.पं. सदस्य)पद एकाच वेळी रद्द झाल्यामुळे प्रामुख्याने ही बाब चर्चेचा विषय ठरत आहे. यामुळे तालुक्यातील अनेक अतिक्रमण धारकांना चाप बसणार आहे व अतिक्रमण धारकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे.



# महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त पाल येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

आधुनिक केसरी

फुलंब्री तालुक्यातील पाल येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात शेकडो रुग्णांनी तपासणी सहभाग नोंदवला . फुलंब्री तालुक्यातील पाल येथील उपसरपंच मा.श्री.ज्ञानेश्वर तेजराव जाधव मित्र मंडळ. छत्रपती संभाजीनगर येथील लायन्स क्लब नेत्रालय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील विठ्ठल मंदिरात सकाळी नऊ वाजता कॉंग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते. धनगर समाजाचे नेते मा. श्री. गणपत तुकाराम ढेपले.उपसरपंच ज्ञानेश्वर तेजराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिराचा शुभारंभ झाला. नंतर सदरील सर्व नागरीकांची डोळ्याची तपासणी कम्प्युटर मशीनद्वारे करण्यात आली. या तपासणी फी आकारण्यात आले नाही. ज्या नागरीकांना डोळ्यांना नंबर निघालेल्या रुग्णांना सवलतीच्या दरात जाग्यावर चष्मे सुद्धा उपलब्ध करून देण्यात आले.या शिबिरात दुपारी एक वाजेपर्यंत ४७० रुग्णांनी लाभ घेतला.या शिबिरात मोतीबिंदू मोफत ऑपरेशन साठी नऊ रुग्णाचा निवड सुद्धा करण्यात आली असुन शिबिर यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लब नेत्रालयचे डॉ.संतोष मंजुळे.योगेश निकाळजे. नंदनी चंपियन यांनी मोलाचे परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित.

तानाजी पाटील जाधव,गणेश जाधव,संदीप दत्तात्रय जाधव,विजय गायकवाड,भगवान जाधव.साहेबराव जाधव, विनायक जाधव,सारंगधर जाधव,विजय जाधव. कैलास जाधव, दिनकर जाधव. आजिनाथ जाधव. राधाकिसन गायकवाड. सखाराम गायकवाड. सुभाष गोल्हारे.दत्तू जाधव.केशव जाधव. वाहेद पठाण.बाबू शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती






# सचिन कोरडे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान



आधुनिक केसरी

**धाराशिव :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व दैनिक मराठवाडा साथी'च्या वतीने देण्यात येणारा पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या थाटामाटात छत्रपती संभाजी नगर येथे नुकताच पार पडला.

राज्याचे सहकारमंत्री माननीय श्री. अतुलजी सावे साहेब यांच्या हस्ते आधुनिक केसरीचे धाराशिव जिल्हा प्रतिनिधी श्री सचिन कोरडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व प्रेरणादायी पुस्तके देऊन कोरडे यांना गौरविण्यात आले. यावेळी मंचावर राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, संपादक जगदीश बियाणी, मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा संपादक डॉ. प्रभू गोरे, व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सचिन कोरडे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध विषय हाताळले आहेत.त्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल सचिन कोरडे यांच्यावर ग्रामीण भागासह सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# सीएसएमएसएसला राष्ट्रीय पातळीवर संशोधनामध्ये यश

आधुनिक केसरी

कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित (सी. एस. एम. एस. एस.) छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या टीम संस्काराच्या एम बहाने राष्ट्रीय पातळीवर सर्वोत्कृष्ट संशोधनामध्ये प्रथम तर रेसिंगमध्ये देशात दुसरा क्रमांक मिळवला आहे.

इन्फी लीग मोटर स्पोर्ट्स आयोजित ए. टी. व्ही. सी. २०२३ यांनी एम. बहा ही राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा दि. १ मार्च ते ५ मार्च दरम्यान पुणे येथे आयोजित करण्यात आलेली होती. यामध्ये सी. एस. एम. एस. एस. छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या टीम संस्काराच्या एम बहाने सहभाग घेतलेला होता. (नॅशनल लेवल ऑल टरेन वेहिकल डिजाईन अँड मॅनुफॅकचरींग). यामध्ये टीम संस्काराने ज्वलन इंजिन श्रेणीमधील रेसमध्ये द्वितीय तर सर्वोकुष्ट संशोधनासाठी प्रथम पारितोषिक मिळाले. विद्यार्थ्यांनी प्रदूषण कमी करण्यासाठी स्वतःचा कॅटलॅटीक कनवर्टर (सायलेन्सर) तयार केला होता. त्यामध्ये कॅप्टन कार्तिक गिते (कॉम्पुटर सायंस इंजिनीअरिंग) इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग शाखेमधून रामेश्वर जाधव, महेश पालवे, अभिषेक लाले, विशाल बारगळ, प्रतिक पांढरे, तीर्थराज आहेर, संदीप गोमलाडू, मेकॅनिकल इंजिनीअरिंग शाखेमधून प्रांजल राठोड, ऋतुजा सुरसे, वैभव वाघ, यशवंत साळुंके, ऋषिकेश नरवाडे, आदित्य सकटे, गणेश मुरारीकर, करण मगर, गंगाधर लुटे आणि इलेक्ट्रॉनिक अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनीअरिंग शाखेमधून विनोद साळुंके, सोमेश राजपूत या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रा. पवन चौधरी, प्रा. रवींद्र सुरासे यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा विद्यार्थ्यांनी पार पडली. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजित मुळे, सचिव श्री . पद्माकरराव मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, विभागप्रमुख डॉ. रामचंद्र चोपडे, डॉ. देवेंद्र भुयार, प्रा. अभय मुदिराज यांनी अभिनंदन केले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती प्रत्येक कार्यालयात साजरी करा

आधुनिक केसरी

सोयगाव : सोयगाव तालुका व सावळदबारा परिसरातील गावांमध्ये महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची आज जयंती मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे याकरीता तालुक्यात कार्यालयात व ग्रामपंचायत मध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती साजरी करा असे आवाहन सरपंच रत्नाताई सुरेश चव्हाण घाणेगांव तांडा यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाचा तशा जी. आर.आहे. सोयगाव तालुक्यात तसेच गावातील ग्रामपंचायतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करणे क्रमप्राप्त आहे. ज्या ग्राम पंचायती मध्ये जयंती साजरी केली जाणार नाही त्या ग्रामपंचायतीचे फोटो किंवा व्हिडीओ शूट करून, तसेच त्या गावातील सरपंचानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करणे बंधनकारक करण्यात आले आहे एखाद्या ग्रामपंचायतमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली नाही तर का साजरी केली नाही ? याचे स्पष्टीकरण गावातील द्यावे लागणार आहे.करीता प्रत्येक ग्रामपंचायमधे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करा असे आवाहन सरपंच रत्नाताई सुरेश चव्हाण यांनी केले आहे.



सरपंच रत्नाताई चव्हाण

# सावळदबारा येथील लाईनमन ज्ञानेश्वर घोडके यांचा सत्कार

आधुनिक केसरी

सोयगाव : तालुक्यात विद्दुत वितरण कंपनी मर्यादित महाराष्ट्र राज्य महावितरण छत्रपती संभाजीनगर यांच्या सोयगाव येथे महावितरण कार्यालयात उपकार्यकारी अभियंता निरज बिदे यांच्या मार्गदर्शनाखाली आपण महावितरण कंपनीच्या तांत्रिक विभागात काम करीत असताना सन २०२२-२३ च्या कार्यकाळात केलेल्या वसुलीच्या उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सोयगाव उपविभागात मार्च अखेरीस वीजबिल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा महावितरणच्या वतीने बुधवारी सत्कार करण्यात आला. सोयगाव उपविभागात सोयगाव, बनोटी, फर्दापूर आणि सावळदबारा या चार शाखांमधून उद्दिष्टापेक्षा जास्त वसुली केल्याबद्दल विकास पाटील, तौसिफ सैयद, सुनील साळवे आणि ज्ञानेश्वर घोडके या चार लाइनमनचा कार्यकारी अभियंता सुरेश जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.तर ज्ञानेश्वर घोडके यांचा सत्कार उपकार्यकारी अभियंता निरज बिदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.यावेळी उप कार्याकारी अभियंता निरज बिदे सोयगाव यांनी वीजबिल



व सुरक्षितता या बद्दल कर्मचाऱ्यांना सखोल अशे मार्गदर्शन करण्यात आले.तसेच इतर २५ कर्मचाऱ्यांनी उल्लेखनीय प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी सुरेश बन्सीलाल जाधव,उपअभियंता नीरज बिदे, अभिजित गौर,प्रकाश जगताप उप व्यवस्थापक सिल्लोड, योगेश जाधव सहाय्यक अभियंता,सचीन अगलावे सहाय्यक अभियंता सिल्लोड व सोयगाव तालुक्यातील व सावळदबारा येथील पूर्ण कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

# पाटबंधारे विभागाच्या या भोंगळ कारभारामुळे विनाकारण पाण्याची नासाडी

आधुनिक केसरी

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील गिरिजा मध्यम प्रकल्पातून सध्या आवश्यकता नसताना दोन्ही कालव्याद्वारे पाणी सोडून एकप्रकारे प्रकल्प रिकामा करण्याचाच प्रकार पाटबंधारे विभागाकडून सुरू आहे. पाटबंधारे विभागाच्या या भोंगळ कारभारामुळे विनाकारण पाण्याची नासाडी होत आहे. याअगोदर पाणी सोडलेले नसतानाही दोन्ही कालव्याद्वारे पाण्याची गळती होऊन दररोज कित्येक हजारो लिटर पाणी वाया जात होते त्यानंतर एका कालव्याची गळती बंद करण्यात आली आणि तो प्रकार थांबत नाही तोच आता कुठल्याही प्रकारची आवश्यकता नसताना पाणी सोडण्यात आले आहे. सद्य स्थितीत 50 टक्क्यांपर्यंत त्याहीपेक्षा कमी पाणीसाठा आहे. गिरजा मध्यम प्रकल्पातील पाणी यावर्षी रब्बी पिकांना शेतकऱ्यांना उजव्या व डाव्या कालव्यातून योग्य वेळी सोडण्यात आले होते त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पिक भरून शेतकऱ्यांना लाभही झाला होता.

या मध्यम प्रकल्पातून तालुक्यातील बाजार सावंगी सह व खुलताबाद शहरासह तालुक्यातील अनेक गावांना तर फुलंब्री तालुक्यातीलही काही गावांना पिण्याचा पाण्याचा पुरवठा होतो मात्र सध्या गरज नसताना देखील दोन्ही कालव्यातून पाणी सोडले जात आहे त्यामुळे पाणी पातळीत घट होत असून पाण्याची पातळी खालावत आहे तशातच उन्हाळा असल्याने तीव्र उन्हाने व बाष्पीभवनाने पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत आहे तालुक्यातील अनेक गावांना पिण्याचे पाणी पुरवठा योग्य व्हावा यावर्षी पाणी टंचाई जाणू नये तसेच टँकरची मागणी होऊ नये . सध्या गरज नसताना दोन्ही कालव्यातून सोडण्यात आलेले पाणी तात्काळ बंद करावे अशी मागणी येथील तंटा मुक्ती समितीचे माजी अध्यक्ष पुंजाजी नलावडे यांनी गिरजा मध्यम प्रकल्पाचे पाटबंधारे विभागाचे अधिकारी वर्जे यांना मोबाइलद्वारे बोलून मागणी केली आहे.



महाराष्ट्र Business Katta













# डॉ. आंबेडकरांचे कार्य सूर्याच्या तेजासारखे आणि प्रेरणा देणारे - डॉ. श्रीकांत देशमुख

आधुनिक केसरी

जातीव्यवस्थेविरुद्ध लढा उभारून समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही लोकशाही मूल्य रुजविणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती यांची आज जयंती.

आज कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी आपल्या छोटेखानी मनोगतात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयीच्या जीवनपटावर प्रकाश टाकला. 14 एप्रिल ही तारीख उच्चारताच आपल्या अंगामध्ये वेगळेच रोमांच येतात. कारण या पवित्र दिनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, थोर अर्थशास्त्रज्ञ, दलित उद्धारक, कुशल राजकारणी, महान तत्ववेत्ता, मानवतावादी विचारांचे पुरस्कर्ते, चातुरवर्णी व्यवस्थेचा कडाडून विरोध करणारे, दलित वर्गाला शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा. असे ठणकावून सांगणारे,या समाज व्यवस्थेत जे उपेक्षित आहेत. त्या सर्वांना मानवतेची वागणूक मिळाली पाहिजे. यासाठी आपले आयुष्य खर्ची घालणारे व्यक्तिमत्व म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांचा जन्मदिवस अर्थात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती. 14 एप्रिल रोजी संपूर्ण भारतभर नव्हे तर इतर देशांमध्ये देखील त्यांच्या विचारांचे पाईक या दिवशी मोठ्या उत्साहात साजरी करतात. भारतभूमीला पडलेले सोनेरी स्वप्न म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. असे म्हटले तरी काही



वावगे ठरणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन आपणा सर्वांसाठी खूपच प्रेरणादायी आहे. जगावं कसं ?अन्यायाविरुद्ध लढावं कसं? संघर्षातून घडावं कसं? वादळासमोर उभं राहावं कसं? आणि शिक्षणातून स्वप्न साकार करावं कसं? हे डॉ. आंबेडकरांनी स्वतःच्या कृतीतून आपणालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला दाखवून दिले. त्यांना शालेय शिक्षण घेताना अस्पृश्य म्हणून मानहानी स्वीकारावी लागली. पण यामुळे खचतील ते बाबासाहेब कसले. या संघर्षातून त्यांनी अस्पृश्य आणि दिन दलितांचा उद्धार हेच जीवनाचे ध्येय ठरविले. आपले ध्येय साध्य करण्यासाठी शिक्षण हे एक मात्र हत्यार आहे, हे बाबासाहेबांनी फार लवकर ओळखले. ते म्हणायचे "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा!" कारण शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो ते घेईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.

यावेळी कृषी महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, दंत महाविद्यालय अधिष्ठाता डॉ. लता काळे, मानव संसाधन अधिकारी श्री. अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी श्री. संजय अंबादास पाटील, कार्यालय अधिक्षक श्री. विशवनाथ गव्हाणे आणि विभागप्रमुख आदी उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 132 वी जयंती वडोद बाजार येथे उत्साहात



आधुनिक केसरी

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची 132 वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली वडोद बाजार येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती.

शुक्रवारी सकाळी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी वडोद बाजारचे उपसरपंच गोपाळ वाघ वडोद बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे ग्रामपंचायत सदस्य शिवराम मस्के शेख रजाक शुभम गंगावणे ,बाबुराव मंडळे शांताराम तोरणमाळ सोसायटी चेअरमन कडूबा मस्के माजी सरपंच शेख रज्जाक , गणेश वाघ गणेश पांडे जी गोविंद पांडे जी राधाकिसन कोलते पांडुरंग वाघ पांडुरंग ब्रहामने, रमेश वाघ जनार्दन शिंगारे, डॉक्टर नदीम शेख साबेर पठाण ,कडू ब नवतूरे, सचिन भिवसंने, विजय भिवसाने शामा हिवराळे प्रफुल शिंदे काशिनाथ वाघ रामदास कापसे भाऊसाहेब जाधव सचिन तोरांमल गौतम नवतुरे ताजा मत शहा , शेख सद्दाम, शामराव दुबे, धीरज कोलते वृषभ पांडे जी ग्रामविकास अधिकारी नारायण पात्रे. आशिष वाघ , शांताराम तोरणमल हिवराळे राहुल सह ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नायगाव ग्रामपंचायतच्या रिक्त सरपंच पदांच्या निवडणुकीबाबत न्यायालयात याचिका

आधुनिक केसरी

**पैठण :** नायगाव तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद येथील सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुक हि फेब्रुवारी २०२१ मध्ये घेण्यात आली होती त्याच प्रमाणे सदर निवडणुक वेळी संरपच पद हे निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्या मधुन करण्याचा कायदा २०२० अस्तित्वात होता.त्या अनुषंगाने श्रीमती.सुशिला भास्कर गिरगे या ग्रामपंचायत सदस्य मधुन संरपच म्हणून निवडून आल्या होत्या तद्नंतर त्यांचा मृत्यू झाल्या मुळे सदर सरपंच पद रिक्त झाले होते.त्यामुळे सध्याचे उप सरपंच सौ.गिता किशोर दसपुते, ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब गिरगे,सौ.लता घटे, यांनी मा.जिल्हा अधिकारी व तहसिलदार पैठण यांच्या कडे अर्जा द्वारे सरपंच यांची रिक्त झालेल्या जागेवर सदस्य यांची पोट निवडणूक घेऊन सरपंच यांची नियुक्ती २०२० च्या कायद्या नुसार सदस्या मधुन करण्यात यावी म्हणून मागणी करण्यात आली होती.परंतु मा.जिल्हाधिकारी व तहसिलदार तथा निवडणुक अधिकारी यांनी दि12/04/2023 रोजी ग्रामपंचायत सदस्यांना नोटीस देऊन सरपंच पदाचे निवड ही सदस्यांची पोट निवडणूक न घेता दि.13/04/2023 रोजी ठेवली आहे सदरचे कृत्य हे कायद्याशी सुसंगत नसल्या कारणाने वरील तिनही सदस्य यांनी त्या नाराजीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.सदर याचिका दि.12/4रोजी सुनवनीस आल्या असता मा .

न्यायालयाच्या निदर्शनास असे आणुन देण्यात आले कि नायगाव ग्रामपंचायत सरपंच पदाची निवडणूक हि2020च्या कायद्यानुसार ग्रामपंचायत




सदस्यांची पोट निवडणूक घेतल्या शिवाय सरपंच पदाची निवडणूक करता येणार नाही.
व तसेच निवडणूक कार्यक्रमाची नोटीस 3 दिवस देने बंधनकारक असताना सुद्धा मा.निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी दि13/04/2023 रैजी ठेवलेली निवडणूक हि बेकायदेशीर आहे.असे निदर्शनास आणून दिल्या नंतर मा.उच्च न्यायालयाचे द्विसदस्यीय खंडपीठ औरंगाबाद मा.एन.डब्ल्यु.सांबरे न्यायमूर्ती व मा.एस. जी.चपळगावकर यांनी प्रतिवादी राज्य शासन जिल्हा अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी पैठण यांना नोटीस काढून उद्या होऊ घातलेली सरपंच पदाची निवडणूक हि दसपुते व इतर यांनी केलेल्या याचिकेच्या अधिन राहील असे आदेश केले.व पुढील सूनवनी 2मे2024रोजी ठेवण्यात आली.याचीकाकर्ते तर्फे अँड. डी.एस माळी यांनी काम पाहीले तर प्रतिवादी शासन व इतरा तर्फे सरकारी वकील श्री.यावलकर यांनी काम पाहिले.

# सिंदफणा पब्लिक स्कूल येथे सीबीएसईचे प्रशिक्षण संपन्न







आधुनिक केसरी

**माजलगाव :** येथील सिंदफणा पब्लिक स्कूल मध्ये शाळेच्या सचिव मंगलाताई सोळंके आणि समन्वयक नीला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून केंद्रीय माध्यमिक बोर्डाच्या विभागीय कार्यालय पुणे यांच्यामार्फत शाळेच्या शिक्षकांसाठी अध्ययन फल निष्पती आणि अध्यापनशास्त्र या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

सविस्तर वृत्त असे की, नवीन शैक्षणिक धोरण प्रणालीनुसार प्रत्येक शाळेने शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण आणि व्यावसायिक विकासावर लक्ष केंद्रित करणे अपेक्षित आहे. संलग्नता उपनियमांच्या कलम १६ नुसार "प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापक/ शिक्षक आणि शाळा संकुलाच्या संचालक यांनी किमान ५० तास सतत व्यावसायिक विकास (CPD) मध्ये भाग घेणे गरजेचे आहे. संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम योग्यरित्या चित्रित केला जाईल आणि शिक्षकांच्या प्रशिक्षण प्रमाणपत्रांसह दस्तऐवजीकरण आणि नोंदी पडताळणीसाठी केंद्रीय शिक्षण मंडळाच्या संबंधित प्रशिक्षण केंद्राकडे दरवर्षी अहवाल पाठवणे बंधनकारक आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण विषयक विचारांचा आदर्श समोर ठेवून सीबीएसई च्या नवीन शैक्षणिक वर्षामध्ये बीड जिल्ह्यात पहिल्यांदाच अशा प्रकारच्या प्रशिक्षणाचे आयोजन करून सिंदफणा पब्लिक स्कूल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली.

या प्रशिक्षण शिबिरामध्ये प्रमुख वक्ते म्हणून औरंगाबाद येथील एमजीएम स्कूलचे प्राचार्य गणेश तरटे आणि संजीवनी इंटरनॅशनल स्कूल शिर्डी च्या प्राचार्या सुंदरी सुब्रमणियन हे लाभले होते. प्राचार्य गणेश तरटे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना शिक्षकांसाठी प्रत्येक विद्यार्थी महत्वाचा घटक आहे हे लक्षात ठेऊन विविध अध्यापन पद्धतींचा अवलंब करावा असे नमूद केले तर सुंदरी सुब्रमणियन यांनी मार्गदर्शन करताना अध्ययन फलनिष्पत्ती हा अध्ययनाचा महत्त्वपूर्ण गाभा असून त्यावर प्रत्येक शिक्षकाने भर द्यावा असे आव्हान त्यांनी केले. विविध शैक्षणिक उपक्रमांनी भरभरून असलेल्या या प्रशिक्षणाचा आनंद शाळेतील सहभागी शिक्षकांनी घेतला. सबंधित प्रशिक्षणामुळे नवीन शैक्षणिक धोरणातील बदल वर्गात अवलंबताना सोयीचे जाईल असे मत या प्रशिक्षणातील सहभागी शिक्षिका ज्योती जोशी यांनी व्यक्त केले.

हे प्रशिक्षण शिबिर यशस्वी करण्यासाठी बीड जिल्हा सीबीएसई शाळांचे समन्वयक प्राचार्य शितल सर्वज्ञ, सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य,अन्वर शेख, उपप्राचार्य उपप्राचार्य राहुल कदम, प्रशिक्षण शिबिर समन्वयक जॉन चाको, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# प्रथमत: व अंतिमही भारतीय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतामध्ये जातिवाद आजही एवढा भक्कम आहे ज्या बाबासाहेबांनी समस्त मानव जातीला समता, बंधुता, न्याय,व स्वातंत्र्य या गोष्टी बहाल केले. त्याच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना आजही जातीत बंद केले जाते. यातून आपली वैचारिक बेइमानी लक्षात येते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एकाच जातीसाठी काम केले एका जातीच्या न्याय हक्कासाठी लढले याचा अर्थ बाकीच्या सर्व जातींना संविधानाच्या अगोदर किंवा बाबासाहेबांच्या अगोदर सर्वांना शिक्षण, आरक्षण, नोकरी, समता बंधुता ,न्याय ,व हक्क अधिकार होते असेच म्हणावे लागेल . हजारो वर्षापासून खितपत पडलेल्या माणूस, माणुस असूनही माणसासारखे जीवन जगण्याचा अधिकार नसलेल्या, धर्मांच्या अनिष्ट रूढी परंपरेमध्ये बांधून ठेवलेल्या शिक्षणाची द्वार पूर्णपणे बंद असलेल्या मानव समाजाला बाबासाहेब आंबेडकरांनी अज्ञानरूपी अंधारातून काढून शिक्षणरूपी प्रकाश देऊन त्यांना संरक्षण दिले. धर्माच्या जाती उतरंडीमध्ये अनेक जाती निर्माण केल्या गेल्या आणि एकदा दुसऱ्या जाती वरती ठेवून प्रत्येक जात दुसऱ्या जातीला हीन कनिष्ठ व दुय्यम समजत होती. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व जातींना समान करून एका लाईन मध्ये उभे केले. सर्वांना भारतीय म्हणून ओळख दिली. सर्वांना समान हक्क अधिकार, समता ,स्वातंत्र्य, न्याय दिला ह्या गोष्टी देताना बाबासाहेब आंबेडकरांनी कोणताही भेदभाव केला नाही. पूर्वीची परिस्थिती बघितली तर प्रत्येक जातीला वेगवेगळी वागणूक असे. स्वातंत्र्य, समता,न्याय आणि शिक्षण या गोष्टी लोकांच्या कल्पनेतही नसत तोंड असून बोलता येत नसेल.

पाय असून चालता येत नव्हते, डोळे असून वाचता येत नव्हते, हात असून लिहिता येत नव्हते, अशी निष्क्रिय माणसांची भरती समाजामध्ये झालेली होती. या निष्क्रिय झालेल्या माणसांमध्ये प्राण टाकण्याचे काम बाबासाहेब आंबेडकरांनी केले. वाचण्याचा किंवा शिक्षण असा अधिकार एकाच जातीला नव्हता असे जर कोणाला वाटत असेल तर त्यांच्या मेंदूचा वापर हा शंभर टक्के बंद आहे असेच म्हणावे लागेल. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कधीही जातीचा किंवा धर्माचा मर्यादित विचार केला नाही. उलट हजारो वर्षापासून ज्या समाजाला शिक्षण ,अधिकार, समता, स्वातंत्र्यापासून दूर ठेवले होते व सगळीकडे एकच वर्णाची हुकूमशाही होती, त्यार्णाची हुकूमशाही बाबासाहेबांनी तोडून टाकली म्हणून त्या एका वर्णा चे प्रचंड नुकसान झालेले आहे. आणि नुकसान झालेल्या वर्गांनी बाबासाहेब आंबेडकरांना अनेक अडथळे अनेक समस्या निर्माण केल्या होत्या. जेणेकरून

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना जातीमध्ये बंद करून त्यांचे कार्य समजून घेऊन बाबासाहेबांना एका जातीचे व एकच धर्माचे मनाने म्हणजे अजूनही आपण आपल्या मेंदूचा वापर करून न घेतल्यासारखे होय. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व विचार कधीही न वाचलेल्या लोकांच्या डोक्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर फक्त एका जातीच्या आणि धर्माचे उदाहरण म्हणून आहेत .**



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

बाबासाहेब आंबेडकर हजारो वर्षापासून ज्या ज्या समाजाला हक्क अधिकार शिक्षण नाकारले गेले होते, महिलांचे हक्क अधिकार नाकारले गेले होते अशा घटकांसाठी बाबासाहेबांनी यशस्वीपणे काम करू नये. म्हणून अनेक अडीअडचणी त्यांच्यासमोर निर्माण करण्यात येत होत्या. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समजून घेताना आपल्याला आपला मेंदू जागृत ठेवून संविधानापूर्वीची समाज व्यवस्था समजून घेणे आवश्यक आहे. जर आपल्याला संविधानापूर्वीची समाजव्यवस्था समजली नसेल तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समजणार नाहीत. मानवानेच मानवावरती एवढे अन्याय अत्याचार करावे, मानवानेच मानवाला एवढं तुच्छ लेखावे की मंदिरामध्ये जाण्याची मुभा नसावी? सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याची मुभा नसावी? गावांमध्ये जाण्याची मुभा नसावी? एखाद्या माणसाला जर स्पर्श केला तर तो माणूस वाटायचा, एखाद्या माणसाने वरच्या जातीतील माणसाच्या अन्नाला जर स्पर्श केला तर ते अन्न पवित्र व्हायचे, एवढा तिरस्कार करणारी विषमतावादी व्यवस्था बाबासाहेब आंबेडकरांनी उध्वस्त करून टाकली. धर्मग्रंथांनी अनेक बंधने लादून माणसा माणसांमध्ये भेद, महिलांना दासी बनवून अनेक वर्ष धर्माच्या नावावर लोकांचे मानसिक आर्थिक शोषण केले. आणि यातून समस्त मानवाला मुक्त करण्याचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतःला कधीच जाती धर्मात बांधून न घेता देशहिताचा विचार केला मी प्रथमही भारतीय आणि अंतिमही भारतीय असे रोखठोक बोलून, भारत देशाच्या हिताचे कामे त्यांनी केले संविधान लिहिताना सुद्धा कोणत्याही धर्माला अती महत्व न देता किंवा कोणत्याही धर्माला न डावलता धर्म बाजूला सारून माणसाला महत्त्व देऊन संविधानाची निर्मिती केली. आज आम्हाला बाबासाहेब समजून घेताना हजारो वर्षापासून असलेली विषमता अस्पृश्यता अज्ञान या गोष्टीवर बोलणे आवश्यक आहे. जर याच गोष्टीची जाणीव नसेल तर संविधानाचे व बाबासाहेबांचे महत्त्व कळणार नाही. आणि मुळात पूर्व परिस्थिती समजून घेणे इतकी बौद्धिक कुवत बहुतांश भारतीय लोकांमध्ये नाही. लोकांसाठी बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःचे पूर्ण आयुष्य खर्ची घातले आणि न्याय हक्क अधिकार मिळवून दिले, समतेचा अधिकार दिला, जी लोक गाव कुसा बाहेर राहत होते, ज्यांना पाणी पिण्याचा अधिकार नव्हता, ज्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता, ज्यांच्या स्पर्शाने अन्न बाटायचे, माणूस बाटायचा, शेती करणारे हीन असायचे, अशा लोकांना थेट देशाच्या सत्तेमध्ये वाटा देणारे बाबा साहेब एकमेव सच्चे भारतीय होते, आणि राहणार. परंतु बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यांची व्यवस्था उलथून टाकली अशा लोकांच्या पचनी बाबासाहेब आंबेडकर कसे पडणार? आणि संविधानानंतरही जे लोक विषमतेवर आधारित समाज व्यवस्था निर्माण करणारे होते तेच लोकसत्तेत असताना ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य समाजापर्यंत का पोहचु देतील? उलट समाजामध्ये त्यांच्या कार्य व विचाराचा प्रचार होऊ नये म्हणून व्यवस्था निर्माण केली. की ज्यांनी महिलांचे हक्क अधिकार नाकारून महिलांना कोणते हक्क अधिकार नकोत असे सर्वांसमोर मत मांडले परंतु महिलांना अधिकार मिळत नाहीत म्हणून स्वतःच्या मंत्री पदाचा राजीनामा देणारे बाबासाहेब खरंच एका जातीची असू शकतात? बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा परिवर्तनाचा फायदा देशातील हजारो जाती घेत आहेत. परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना हजारो जाती आपले मनात नाहीत ही शोकांतिका आहे. पुरोगामी देशांमध्ये आणि विशेषतः महाराष्ट्रामध्ये एकीकडे आम्ही म्हणतो जातिवाद संपलेला आहे, आणि दुसरीकडे ज्याच्या नावावर देशाचा कायदा आहे, त्यांनी सगळ्यांना समान हक्क अधिकार स्वातंत्र्य बहाल केलेले आहेत अशा व्यक्तीलाच जातीत बंद करून ते एकाच जातीचे उद्धारक आहेत असे उघडपणे सांगितले जाते. तेव्हा काय हे लोक जाती व्यवस्था मान्य करत नाहीत? देशाच्या घटनाकारायला जातीत बंद करणे म्हणजे सरळ सरळ आपण कायद्यासोबत व देशासोबत बेईमानी करणे होय. परंतु सत्य बोलायला विद्रोह समजला जातो.

आज बाबासाहेबांच्या कार्य कोणकोणत्या बाबींवर होते हे ऐकणे लोकांना जातीवाद वाटतो, अरे एक विचार करा संविधानाच्या अगोदर ज्या जातींवर अन्य अत्याचार होत होते ते कसे सहन करत असतील? की जिथे संविधान लागू असताना बाबासाहेबांचे कार्य अनेकांना पचत नाही, तर ज्या घटकासाठी बाबासाहेबांनी कार्य केले त्यांनी अन्याय अत्याचार व सामाजिक विषमतेचे चटके कसे सोसले असतील? मानवतेला काळीमा फासणारी विषमता देशात नांदत होती. लोकांना प्यायला पाणी, रहायला गावात घर, मंदिरात प्रवेश मिळत नव्हता केवळ जाती मुळे.

एवढी मोठ्या प्रमाणात विषमता व अस्पृश्यता होती. महिलांना अनिष्ट रूढी परंपरा मधुन बाहेर काढून तिलाही मन, भावना आहेत, तीही मानव आहे म्हणून तिला सुद्धा मानवाप्रमाणे हक्क अधिकारी पाहिजे म्हणून हिंदु कोड बिल तयार करून महिलांचा मान सन्मान वाढवून हक्क अधिकार मिळत नाही म्हणून मंत्रीपदाचा राजीनामा देणारे बाबासाहेब एकमेव जागतिक महापुरुष होत. राजीनामा दिला नाही तर महिलांना पुरुषांप्रमाणे समान वेतन, प्रसुती पगारी रजा मिळणाऱ्या भारतीय महिला जगात पहिल्या आहेत. सहा महिने प्रसुती काळात पगार मिळतो तो फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळेच. सर्व मानवाला सोबत घेऊन सर्वांगीण विकास करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव भारतीय होते. देशहीताला महत्त्व देऊन त्यांनी कार्य केले. एका जातीच्या धर्मासाठी त्यांना कार्य करायचे असते तर आज बाबासाहेब आंबेडकर यांची जातज्ञसर्वात श्रीमंत असती. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्ता फायदा एकाच जातीसाठी केला नाही म्हणून चहा विकणारा प्रधानमंत्री होतो, आदिवासी महिला राष्ट्रपती होतात, ज्यांना गावात येण्याचा अधिकार नव्हता ते अधिकारी झाले. वरील कार्य व परिवर्तन एकाच जातीचे झाले असे बोलणे केवळ मानसिक गुलामीचे लक्षण होय. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य राष्ट्रासाठी व राष्ट्रातील जनतेसाठी होते कारण ते जसे स्वतः ला भारतीय समजत होते तसेच कार्य भारतीय लोकांसाठी केले म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर सच्चे भारतीय होतै याची प्रचिती येते.

# 'लोकमनातील महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर

आधुनिक केसरी

**विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस म्हणजे एका प्रखर ज्ञानसूर्याची पहाट, क्रांतीचे निशान, अन्यायाविरूद्ध बंडाची सुरुवात, कामगार, शेतकरी, कष्टकरी, वंचित, अस्पृश्य यांची गुलामीतून स्वातंत्र्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे होणारी वाटचाल. अस्पृश्योद्धारक, समाजसुधारक, युगप्रवर्तक, शिक्षणशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, बहुजननायकाचा जन्मसोहळा. सुप्रसिद्ध आंबेडकरी लोकशाहीर स्मृतिशेष वामनदादा कर्डक बाबासाहेबांच्या जन्माचे स्वागत आपल्या गाण्यातून अशी करतात...**



पहाट झाली प्रभा म्हणाली भीम जयंती आली
चांदाची चांदनी येऊन खाली वारा भिमाला घाली
सफेद साडीवर सफेद खणचोळी, लेवून आली ती गगनाची भोळी
ओवाळण्या भीम सख्याला उतावीळ ती झाली...

याप्रमाणे भीमजयंतीचा आनंद साजरा करण्याचे कारण, बाबासाहेबांनी माणूसपण हिरावून घेतलेल्यांना स्वाभिमानाचे जीवन जगण्याचा हक्क दिला. त्यांचे सामाजिक प्रबोधन करून ध्येयाचे सम्यक भान जागे केले. आदर्श आचारधर्म घालून दिला. म्हणूनच बाबासाहेबांचा जन्म दिवस केवळ औपचारिक जयंती न राहता तो महामानवाचा जन्मोत्सव ठरतो. दीनदलित, गरीब, उपेक्षित, कष्टकरी, कामगार, शेतकरी, आदिवासी, महिलांसाठी मग तो अस्मितेचा सोहळा होतो. बाबासाहेबांच्या जन्माचे स्वागत करताना अनेक साहित्यिक, कलाकार, कवी, गायकांनी आपल्या कलाकृतीतून त्यांच्या कार्याचे, जन्माचे महत्त्व अधोरेखित केलेले आहे. परंतु लोककवी वामनदादा यांच्या लेखणीतल्या गीतातले "लोकमनातील बाबासाहेब" काही निराळेच आहेत. तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेत स्पृश्य-अस्पृश्यता पाळल्या जाणाऱ्या काळात बाबासाहेब जन्माला येणे म्हणजे काय? तर वामनदादा म्हणतात...

काल मुजरेच केले रे माझ्या मेलेल्या बापाने
आज मुजरे मला करती भिमाच्या प्रतापाने
गेली सारीच लाचारी आज दिल्लीच्या दरबारी
मला नेऊन बसविले सात कोटीच्या बापाने.

बाबासाहेबांच्या जन्मापूर्वी अनुभवलेली गुलामी, लाचारी आणि बाबासाहेबांच्या क्रांतिकारी कार्यामुळे झालेला बदल म्हणजे विषमतेचे, अन्यायाचे चटके सोसलेल्या शोषितांचे जीवन स्वाभिमानाने उजळले. बाबासाहेबांचे जन्माला येणे म्हणजे कित्येक पिढ्यांचा उद्धार झाल्याची भावना वामनदादा व्यक्त करतात. कदाचित आजच्या पिढीला बाबासाहेब कसे होते? त्यांचे कार्य किती महान होते? त्यांनी प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेऊन आपला व्यक्तीगत स्वार्थ न बघता त्यांनी आपली बुद्धिमत्ता, ज्ञान बहुजन समाजासाठी कसे वापरले ? त्यांची महामानव म्हणून कशी जडण घडण झाली? याची जाणीव असेलच असे नाही. पण त्यांचा दीनदलित, कष्टकरी, उपेक्षित, वंचित यांना किती मोठा आधार होता. तर वामनदादा सांगतात...

काय सांगू तुला आता भीम माझा कसा होता
लेकराला जशी माता भीम माझा तसा होता
काय सांगू तुला वामन भीम माझा कसा होता
सात ठिगळाच्या बंडीचा भीम माझा खिसा होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कोण होते? तर अनाथांचा नाथ, दीनांचा कैवारी, दुर्बलांचा आधार, मूकजनांचा आवाज, दुखी वंचितांची माय होते. याचमुळे बाबासाहेब प्रस्थापित व्यवस्थेने नाकारलेल्या तळागाळातल्या लोकांसाठी सर्वकाही होते. विषमतेच्या अन्याय-अत्याचारातून शोषितांना मुक्त करणारा मुक्तिदाता होते. त्यांनी आपल्या आयुष्यातला प्रत्येक क्षण अन क्षण गोरगरिबांच्या कल्याणाकरिता खर्च केला. बहुजन समाजातील प्रत्येकाला माणसासारखे जीवन जगता यावे. सर्वांना प्रगतीच्या वाटा खुल्या असाव्या. तसेच 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' असा यशाचा मूलमंत्र त्यांनी दिला. भेदभावाची विषवल्ली गाडून समतेचे अमृत सगळ्यांना चाखता यावे आणि त्यांचे अज्ञान संपून ज्ञानाचा दीप त्यांच्या जीवनात उजळावा याच तळमळीतून त्यांनी आपला देह झिजवला. परंतु जेव्हा बाबासाहेबांच्या नावाने स्वार्थी लोकं पक्ष, संघटना, संस्था स्थापन करून समाजहित विसरून त्यांनी सांगितलेली प्रागतिक विचारधारा, जगण्याचा आदर्श मूलमंत्र, त्यांनी दिलेली शिकवण विसरतात. तेव्हा लोककवी वामनदादा अतिशय व्यथित होऊन म्हणतात...

भीम माझ्या मधी होता, मान ताठ होती माझी
आज माझ्यातला भिम येथे मीच केला उना
दोष देऊ कुणा सांगा ?

रमेश शिंदे
संपर्क क्र. ९४२२९७०८९

किंवा

भीमाँ तुझ्या विचाराचे जर पाच लोक असते
तलवारीचे तयाचे न्यारेच टोक असते
वाणीत भीम आहे, करणीत भीम असता
वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते

जेव्हा अनुयायी म्हणवणाऱ्या लोकांनी बाबासाहेबांच्या नावाचा वापर सुरू केला आणि विचारांना नाकारून केवळ स्वार्थापायी श्रेय लाटण्याच्या चढाओढीत गुंतवून गेले. परिणामी बहुजन समाजाची प्रचंड हानी झाली. पुरोगामी चळवळीचे अपरिमित नुकसान झाले. यासाठी कुणाला दोष द्यावा? असा प्रश्न वामनदादांना पडला. बाबासाहेबांनी जो विचार दलित समाजाला दिला होता आणि खरंच त्याप्रमाणे समाज वागला असता तर आजही त्यांना पुन्हा गतकाळातील कटू अनुभव आले नसते परंतु कथणी व करणीत फरक झाला आणि बाबासाहेबांच्या पश्चात 'भीमविचार' केवळ आंबेडकरवादी म्हणून घेण्यापुरता उरला की काय? अशी भीती वामनदादा व्यक्त करतात. त्यांच्या मते बाबासाहेब डोक्यावर घेऊन मिरवण्यापेक्षा त्यांचे विचार डोक्यात घ्यावे, पुतळे उभारून विचारधारा बंदिस्त करून त्यांना देवत्व बहाल करण्यापेक्षा त्यांचे जीवन कार्य, आदर्श शिकवण, घालून दिलेले संस्कार विसरलेल्या अनुयायांनी पुन्हा नव्याने बाबासाहेब समजून घ्यावे. त्यांची शिकवण अंगीकारावी. आपल्यासारखाच हाडामासांचा सामान्य माणूस प्रतिकूल परिस्थिती असतानाही शिक्षणातून असामान्य कीर्ती स्थापित करतो. सामाजिक क्रांती घडवितो.आपल्या भारत देशाची राज्यघटना लिहितो.असा हा शिक्षणतज्ञ, अर्थतज्ञ, घटनाकार, महामानव खऱ्या अर्थाने जेव्हा आपण आचरणात आणू तेव्हाच आपण त्यांचे खरे अनुयायी म्हणू शकतो. म्हणूनच वामनदादा निराश होत नाहीत. त्यांना आशा आहे की, खऱ्या अर्थाने बहुजन समाज नव्याने बाबासाहेबांचे एकूण विचार स्वीकारेल आणि नक्कीच परिवर्तन घडेल मग नव्या उमेदीने ते मानवाचे नवे गीत गातात...

माणसा इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे तुझे हित व्हावे
असे तुझे माझे नाते जडावे
तुझ्या संकटाशी इथे मी लढावे.

आंबेडकरी विचाराच्या समाजाने संघर्षाला न घाबरता प्रयत्नाची पराकाष्टा करुन आपल्या जीवनात यश मिळावे. जर त्याला अडचण आलीच तर समता सैनिक होऊन त्याची मदत करण्याची ग्वाही ते देतात. डॉ. बाबासाहेबांच्या कार्याची तेजोमय जीवन प्रवासाची कहाणी जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी आजपर्यंत अनेकांनी वेगवेगळ्या माध्यमातून प्रयत्न केले. लोककवी वामनदादा कर्डक स्वतः आंबेडकरी चळवळीतले कार्यकर्ते होते. १९४३ ला पहिल्यांदा त्यांनी बाबासाहेबांना पाहिले आणि त्यांच्या कार्याने प्रभावित झाले. त्यानंतर डॉ. बाबासाहेबांचे विचार सांगत आपल्या कवितेतून, गाण्यातून समाजजागृती करत राहिले. त्यांचे चार कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांनी १९५४ पासून ते आपल्या आयुष्याच्या शेवटपर्यंत म्हणजे २००४ पर्यंत जवळपास दहा हजारांपेक्षा अधिक कविता/गाणी लिहिली आणि आपल्या ओजस्वी वाणीने गायलीसुद्धा. यातून आपल्याला बाबासाहेबांच्या जीवन कार्याचे विविध पैलू उलगडून दाखवले. आजही मोठ्या आदराने स्मृतीशेष वामनदादांचे गाणे ऐकले जाते. गाणी ऐकल्यानंतर अंगावर शहारे येतात तसेच समाज प्रबोधन होऊन गाण्यातूनच आपल्याला प्रेरणाही मिळते. आपल्या आजच्या संकटावर बाबासाहेबांमुळे आपण कशी मात करणार आहोत आणि त्याचा ह्या पिढीला त्याचा कसा फायदा होणार आहे. हे सांगताना ते म्हणतात...

जरी संकटाची काळ रात्र होती
तरी भीमराया तुझी साथ होती
तुझी तेवण्याची सुरुवात होती
प्रकाशात माझी पिढी न्हात होती...

आपल्या सार्वजनिक जीवनात येणाऱ्या समस्यांशी दोन हात करताना अनोखे नैतिक बळही मिळते. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी आपण त्यांच्या विचारांचे पाईक झाले पाहिजे. हीच त्यांची तळमळ होती. प्रचंड ऊर्जेचा स्रोत असलेल्या बाबासाहेबांना अपेक्षित असलेला समतावादी, आदर्श समाज घडविण्यासाठी त्यांच्या पुरोगामी विचारांचा वसा आणि वारसा जोपासत, अभिवादन करताना कृतज्ञतापूर्वक त्यांच्या शिकवणीस अंगीकारून, त्यांनी दाखवलेल्या दिशेने मार्गक्रमण करत राहावे सोबतीला वामनदादांच्या काव्यपंक्ती सदैव स्मरणात ठेवल्या पाहिजेतच...

तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफान वारा पाऊस धारा मुळी न आम्हा शिवे
जळू परंतू धरती उजळू ,प्रकाश येथे असाच उधळू
सदा चांदणे सुखी नांदणे हेच आम्हाला हवे...

संघर्षाच्या वाटेवर भीमविचारांचा पेटता दिवा घेऊन निघालेला समता दलाचा सैनिक कशाचीही तमा न बाळगता अंधाराला नष्ट करून ज्ञानाचा प्रकाश वाटत, सामाजाच्या भल्यासाठी त्याग आणि समर्पण करण्याची तयारी ठेवत सुखी, आनंदी जगण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती बाळगणाऱ्या या स्मृतीशेष लोककवी वामनदादांच्या काव्यपंक्तीने 'लोकमनातील महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर' प्रासंगिक लेखास पूर्णविराम.